ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

ऑक्टोबर २०१२ • मूल्य १० रु.



धवलक्रांतीचे निर्माते
वर्गीस कुरियन



माणिक गुट्टे यांच्या 'अरूपाचे रूप' या कवितासंग्रहाचे प्रकाशनसमयी
गोपीनाथ मुंडे,
डॉ. सदानंद मोरे
शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा
महसूलमंत्री बाळासाहेब थोरात
कवी माणिक गुट्टे
आणि
ज्येष्ठ कवी सदानंद डबीर



'पंखाविना भरारी' या पुस्तकाच्या दहाव्या आवृत्तीच्या प्रकाशनसमयी
ग्रंथालीचे विश्वस्त
सुदेश हिंगलासपूरकर
संगीतकार
डॉ. सलील कुलकर्णी
लेखिका शरयू घाडी
नागेश घाडी
सानेगुरुजी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पाटील
आणि
लतिका भानुशाली


## ॥ग्रंथाली॥ आणि
## मुद्रण सुविधा केंद्रामार्फत
## प्रसिद्ध कवितासंग्रह




**अरूपाचे रूप**

माणिक गुट्टे


मूल्य १२५ रुपये
सवलतीत ७५ रुपये



**कवडसे**

महेश केळुस्कर

मूल्य ७० रु.
सवलतीत ४० रु.



**ओळखीची वाट**

नीला सत्यनारायण


मूल्य १५० रुपये
सवलतीत ९० रुपये




**वर्तुळ पुसून टाकताना...**

शारदा नवले


मूल्य ८० रुपये
सवलतीत ४५ रुपये




**दु:ख माझे कोवळे**

प्रतिभा सराफ

मूल्य ६० रुपये
सवलतीत ३५ रुपये




**ओंजळ**

काव्यफुलांची

सुभाषचंद्र मयेकर

मूल्य १२५ रुपये
सवलतीत ७५ रुपये

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.),
मुंबई-४०००१६ दूरध्वनी : २४३०६६२४ • granthali01@gmail.com • कार्यालयीन वेळ - ११ ते ६

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**ऑक्टोबर २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक दहावा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

कोळशाचा काळिमा देशभर उगाळला जात होता त्याच काळात धवलक्रांतीचा निर्माता कालवश व्हावा हा आजच्या परिस्थितीने दिलेला काव्यगत न्यायच! गोप्रतिपालकांच्या चोचीला चारा देऊन क्षीरविवेकाने सहकाराचा मंत्र जागवणारे डॉ. वर्गीस कुरियन यांनी श्वेतक्रांती घडवली, ते श्वेतपर्व संपले. आता एकमेकांचे सहकारी म्हणवणारे दोन पक्ष नीर–अविवेकाने श्वेतपत्रिका काढण्यात जुंपले आहेत, हे दुर्दैव. जनतेच्या भल्यासाठी गेल्या पंचवीस वर्षांत झालेला हा मानसिक बदल दुर्लक्षणीय नाही.

पदार्थविज्ञानात रस असणाऱ्या वर्गीस कुरियन यांना नाइलाजाने आणंदला कसे जावे लागले आणि त्यातून त्यांनी कसा इतिहास रचला हे देवेंद्र जैन यांनी या अंकात लिहिले आहे.

विश्व मराठी साहित्य संमेलन या नावाने टोरांटो संमेलन होऊ शकले नाही. त्यावर आपल्याकडे बरीच चर्चा झाली. कॅनडाहून स्मिता भागवत यांनी या दुर्दैवी घटनेची रसिक सहभागी म्हणून घेतलेली दखल लक्षात घेण्यासारखी आहे.

'ईटी' हा सिनेमा गाजला. स्टिव्हन स्पिलबर्गने तो बनवलाही उत्कृष्ट होता. त्याचे कौतुक करताना, त्याची मूळ कथा सत्यजित रे यांची चोरलेली होती व त्याचे श्रेय त्यांना मिळाले नाही याची खंत अपर्णा पाटील त्यांच्या लेखात व्यक्त करत आहेत.

डॉ. माधवी मेहेंदळे यांनी कलानगरीतील प्रवासाचा तिसरा टप्पा या अंकात लिहिला आहे. 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'द्वारा लेखात एका आगळ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होते.

प्रश्न खूप आहेत. त्यावर उत्तरे शोधायला नवी माणसे राजकारणात येत आहेत. बरेच काही घुसळले जाईल. मात्र डोळा दुधाच्या सायीवर, लोण्याच्या गोळ्यावर नसला तर अधिक 'आणंद' पसरेल.

'रुची'चा पुढला अंक नोव्हेंबर–डिसेंबर दिवाळी विशेषांक असेल. त्याचबरोबर कॅनडा, अमेरिका आणि सौदी अरेबिया येथून स्वतंत्र इ–ग्रंथाली दिवाळी अंक सिद्ध होत आहेत. स्मिता भागवत (कॅनडा), विद्या हर्डीकर–सप्रे (अमेरिका) आणि डॉ. उज्ज्वला दळवी (सौदी अरेबिया) या त्या त्या अंकाचे संपादन करत आहेत.

'रुची'चा छापील व अन्य तीन देशांतून फक्त इ–ग्रंथाली असे चार दिवाळी अंक प्रसिद्ध करून 'ग्रंथाली' आगळे दिवाळी विश्व संमेलन भरवत आहे. ते पंचखंडांत पोचेल. आपल्या कमी झालेल्या संवादाला मोकळी वाट मिळेल याची खात्री वाटते.

**– कार्यकारी संपादक**

# या वर्षी ॥ग्रंथाली॥ चे ४ दिवाळी अंक!
# छापील ‘रुची’ व अन्य ३ इ-दिवाळी अंक!!

## ‘ग्रंथाली’च्या ‘रुची’ दिवाळी अंकात-

**चिनी प्रवासी फाहियान** - भगिनी निवेदिता - भावानुवाद - सुहासिनी देशपांडे ✲ **प्रश्नांची वखार** - हेमंत देसाई ✲ **तंबूतला सिनेमा** - अरुण पुराणिक ✲ **भारताचे ‘मंगळ’कार्य** - इस्रोचा प्रवास ✲ **गझलचा बेताज बादशहा : मेहदी हसन** - असिफअली पठाण ✲ **डॉ. बाळ फोंडके यांची मुलाखत** - सरोज जोशी ✲ **वाचनात रमणारे राजकारणी** - प्रवीण बर्दापूरकर ✲ **चित्रकार अरविंद नारळेंशी संवाद** - स्मिता भागवत, कॅनडा ✲ **‘मस्कती’ जयकर** - डॉ. उज्ज्वला दळवी, सौदी अरेबिया ✲ **सॉरी फॉर द ब्रेक** - रविराज गंधे ✲ **लिआनार्दो विंची आणि मायकेलएन्जेलो यांचे किस्से** - डॉ. माधवी मेहेंदळे ✲ **एम.टी.डी.सी.चा बुद्धिस्ट सर्किट प्रकल्प** - जगदीश पाटील ✲ **स्त्रीशिक्षण : प्राचीन ते अर्वाचीन** - डॉ. माया पाटील ✲ **पन्नाशीचा भावुक जेम्स बॉन्ड** - अपर्णा पाटील ✲ **सिनेमातील ॲस्थेटिक्स** - स्वप्ना पाटसरकर ✲ **कुंडलिका नदी आणि टाटा पॉवर स्टेशन** - वसंत वसंत लिमये ✲ **शिवाजीपार्क कट्टा** - जयंत कुलकर्णी ✲ **विधानसभेतील काल्पनिक भाषण** - सु.गो. तपस्वी

**उमेश कदम, प्रल्हाद जाधव, वसुमती धुरू, प्रभा पुरोहित, प्रभाकर वाईरकर** यांचे अनुभव आणि ललित लेखन याशिवाय, **कवितेचे व्यासपीठ**

इ-ग्रंथाली दिवाळी अंक
**कॅनडा**
संपादन - **स्मिता भागवत**

इ-ग्रंथाली दिवाळी अंक
**अमेरिका**
संपादन - **विद्या हर्डीकर-सप्रे**

इ-ग्रंथाली दिवाळी अंक
**सौदी अरेबिया**
संपादन - **डॉ. उज्ज्वला दळवी**

# ‘श्वेतक्रांती’चा निर्माता

## देवेंद्र जैन

भारतासारख्या विकसनशील देशास स्वावलंबी बनल्याशिवाय पर्याय नाही. ज्या देशाचे पूर्वज शेतकरी होते त्या देशास जर प्रगती करायची असेल तर शेतीव्यवस्था केंद्रस्थानी ठेवणे हे जरुरीचे आहे. म्हणून शेतकऱ्यांनी, शेतकऱ्यांसाठी, शेतकऱ्यांच्या समुदायाने केलेली दुधाची क्रांती ही श्वेतक्रांती किंवा धवलक्रांती या नावाने ओळखली जाते आणि ह्या क्रांतीचे प्रणेते आहेत डॉ. वर्गीस कुरियन.

केरळ राज्यातील कलिकत या ठिकाणी २६ नोव्हेंबर १९२१ रोजी सिरीयन ख्रिश्चन कुटुंबामध्ये वर्गीस यांचा जन्म झाला. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळातदेखील हे केरळी कुटुंब उच्चविद्याविभूषित होते. वर्गीस यांचे वडील पुथेनपरक्कल कुरियन हे शल्यविशारद होते. त्यांची आईसुद्धा बुद्धिमान आणि उच्चशिक्षित होती. ती पियानो छान वाजवत असे. त्या काळात ब्रिटिशांचे धोरण भारतीयांना सुशिक्षित करणे असे असल्याने हे कुटुंब अतिशय सुशिक्षित होते.

वयाच्या १४व्या वर्षीच वर्गीस यांनी शास्त्र ह्या शाखेत मद्रासमधील लॉयला महाविद्यालयात प्रवेश घेतला. केवळ १९व्या वर्षी, सन १९४० मध्ये, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर म्हणजे पदार्थ-विज्ञानामध्ये (physics) पदवी प्राप्त केल्यानंतर अभियांत्रिकी शिक्षणसुद्धा वर्गीस यांनी पूर्ण केले. आजच्या तरुण पिढीला आदर्शवत असे वर्गीस यांचे कॉलेज लाइफ होते. उत्तम शैक्षणिक कामगिरीसोबत टेनिस, बॅडमिंटन, क्रिकेट तसेच मुष्टियुद्ध या खेळांमध्ये वर्गीस यांनी कॉलेज गाजवले होते. त्या काळात एनसीसीच्या धर्तीवर युटीसी (University Training Core) अस्तित्वात होते.

वर्गीस यांच्यात शिस्त आणि नियोजनबद्धता असल्यामुळे लष्करभरतीचे विचार चालू झाले होते. परंतु वडिलांच्या अकाली निधनामुळे त्यांच्या आईने त्यांचे मन वळवले व वर्गीस टाटा आयर्न अँड स्टील कंपनीमध्ये (टिस्को) शिकाऊ उमेदवार म्हणून कामाला लागले. त्याकाळी ही निवड अतिशय प्रतिष्ठेची मानली जात असे. वर्गीस यांचे मामा जॉन मथाई हे टिस्कोचे संचालक होते. त्यामुळे कळत-नकळत टिस्कोमध्ये वर्गीस यांना अतिशय चांगली वागणूक मिळू लागली. वर्गीससारख्या स्वाभिमानी मुलाला मात्र हा रेड कार्पेट त्रासदायक वाटत होता व मनोमनी कुठेतरी असे काहीतरी करायचे की ज्यामध्ये influence / ओळखीचा फायदा होणार नाही व स्वकर्तृत्वाला वाव मिळेल असे काही करायचे अशी खूणगाठ वर्गीस यांनी मनात बांधली.

त्या काळी परदेशातील उच्च शिक्षणाकरता ब्रिटिश सरकार शिष्यवृत्ती देत असे. धातू/पदार्थविज्ञान या आवडत्या शास्त्रात परदेशात जाऊन उच्चशिक्षण घेता येईल या उद्देशाने वर्गीस यांनी अर्ज केला होता. निवडसमितीची मुलाखत प्रक्रिया पूर्ण झाली. परंतु वर्गीस यांच्या आवडीचे धातूविज्ञान वा पदार्थविज्ञान विषयासाठी न मिळता नसून दुग्ध व्यवसायात अभियांत्रिकी करण्याच्या शिष्यवृत्तीसाठी त्यांची निवड झाली. जणू दैवाची हीच योजना होती, की भारतासारख्या अविकसित देशात धवलक्रांती-दुग्धक्रांतीचा जनक घडायचा होता. आपल्या देशास दुग्ध व्यवसायात परिपूर्ण बनवण्यासाठीच जणू डॉ. वर्गीस कुरीयन यांचा जन्म झाला होता व त्यांची यासाठीची निवड ही एक प्रकारची नांदीच होती.

त्याकाळी न्युक्लिअर फिजिक्सची चलती होती, कारण अणुबॉम्बचा स्फोट झाला होता व वर्गीस यांना त्याची आवड होती, दुग्धव्यवसाय तर त्यांच्या खिजगणतीत सुद्धा नव्हता.

दुधाच्या बाबतीत प्राथमिक ज्ञान मिळवण्यासाठी वर्गीस यांना इंपिरिअल डेअरी रिसर्च इन्स्टिट्यूट, बंगलोर येथे पाठवण्यात आले होते. तिथेच त्यांना त्यांचा भविष्यातील दुग्ध व्यवसायातील साथी दलाया भेटले.

वर्गीस १९४६ साली अमेरिकेला गेले. तिथे त्यांनी Heredily in cast iron या विषयावर रिसर्च केला पण त्यांच्याआधीच या विषयावर शोध झाल्याचे नंतर त्यांच्या लक्षात आले. डॉ. वर्गीस यांच्या मते जे झाले ते चांगलेच घडले कारण जर हा शोध डॉ. वर्गीस यांनी लावला असता तर ते अमेरिकेतच राहिले असते व अब्जावधी रुपये कमावले असते व नंतर धवलक्रांती झालीच नसती. नियतीने असे पुन्हा एकदा चकवले. जेव्हा ते भारतात परत आले तोपावेतो भारताची फाळणी झाली होती व स्वतंत्र भारतात त्यांचे मामा जॉन मथाई वित्तमंत्री बनले होते.

सरकारच्या शिष्यवृत्तीद्वारा उच्च शिक्षण घेतल्यामुळे सरकारच्या अखत्यारीतील

काम स्वीकारणे वर्गीस यांना बंधनकारक होते. मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीच्या डीनने वर्गीस कुरीयन यांची शिफारस युनियन कार्बाईड या कंपनीत रुपये १००० वेतनावर केली होती. त्याचवेळी भारत सरकारच्या शिक्षणखात्याने वर्गीस कुरीयन यांना दुग्धव्यवसाय विकसित व्हावा या उद्देशाने गुजरातमधील 'आणंद' या ठिकाणी महिना ६०० रुपये पगारावर जाण्याचा आदेश दिला. डॉ. वर्गीस यांना न्यूक्लिअर फिजिक्समध्येच काम करायचे असल्याने त्यांनी ही नोकरी नापसंत असल्याचा अभिप्राय दिल्यावर, शिक्षणखात्यातील उपसचिवांनी उच्च शिक्षणाकरिता खर्च पडलेले ३० हजार रुपये परत मिळवण्यासाठी आम्ही तुझ्यावर खटला भरू असे सांगितले तेव्हा मात्र डॉ. वर्गीस यांच्यासमोर काहीही पर्याय उरला नाही.



त्रिभुवनदास पटेल यांच्यासमवेत वर्गीस कुरियन

आणंदसारख्या छोट्या गावात काही अलौकिक, विलक्षण असे घडेल याची बिलकूलही कल्पना नव्हती. वास्तविक इंग्रजी आणि केरळी भाषेचे ज्ञान असलेली एक केरळी मासांहारी व्यक्ती, गुजराती मुलाखत पाठवणे म्हणजेच विरोधाभास होता. त्या विभागातील पेस्तनजी एडलजी नावाच्या अतिशय हुशार व धूर्त उद्योजकाच्या तावडीत तेथील दुग्धव्यवसाय होता. त्याकाळच्या बॉम्बे इलाख्याला दूधपुरवठा करण्यासाठी बॉम्बे मिल्क स्किमसारखी संघटना ब्रिटिश सरकारने स्थापन केलेली होती. पेस्तनजी यांनी 'पोल्सन डेअरी'च्या माध्यमातून त्याकाळी कैरा शहरातून मुंबईला दूधपुरवठा करण्याची मक्तेदारी निर्माण केली होती. मुंबईचे दुग्धआयुक्त, दूध संकलन करणारे कंत्राटदार तसेच व्यापारी, सगळेच्या सगळे पेस्तनजींच्या मदतीने दुधाची 'मलई' खिशात घालत होते व शेतकऱ्यांचे मात्र अतोनात हाल होत असत. वाढीव दराच्या अगदीच नगण्य असा हिस्सा त्यांच्याकडे येत असे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली मोरारजीभाई पटेलांनी कैरा सहकारी संस्था स्थापन केली. अतिशय त्यागी, निर्विकारी, सज्जन, सालस अशा त्रिभुवनदास पटेल यांची नियुक्ती या संस्थेच्या अध्यक्षपदासाठी झाली. या घटनेने वेगळी चक्रे फिरण्यास सुरुवात झाली. त्रिभुवनदास पटेलांनी सरदार वल्लभभाई पटेलांच्या मदतीने 'पोल्सन'ची मक्तेदारी मोडून काढण्यास सुरुवात केली. ही सहकारी दूधसंस्था स्थापन करण्यासाठी कैरा जिल्ह्यात त्रिभुवनदास पटेल वर्षभर खेड्यापाड्यात मैलोन्मैल भटकले. नेमक्या याच काळात वर्गीस कुरियन यांचे तेथे आगमन झाले. त्यांच्या मते, त्याकाळी त्यांची अवस्था पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखी झाली होती.

न्यू यॉर्कहून परतलेला उच्च-विद्याविभूषित तरुण ज्याला पदार्थविज्ञान या विषयात आवड होती, तो एका लहान अशा नीरस गावी आणंदला आला. राहायला साधे गॅरेज होते, कुठे मी न्यू यॉर्कची लगबग, उत्साह, धामधूम आणि कुठे हे अविकसित, अशिक्षित खेडेगाव, किती विरोधाभास!

तर अशा ह्या आणंद गावात, दुग्धव्यवसाय अभियंता म्हणून नियुक्ती झालेल्या कामसू व्यक्तिमत्त्वाच्या वर्गीस यांना काम असे काहीच नसे, त्यामुळे दिवसच्या दिवस बेचैनीत, उदासीत जात होते. मनात सारखे कुठे येऊन अडकलो, हे काय विचित्र झाले असे विचार सतत चालू असायचे. वाटेल ते झाले तरी इथे आणंदमध्ये राहायचे नाही व परत शहराकडे आपल्या आवडत्या क्षेत्रात काम शोधायचे याकडे वर्गीस यांचे मन लागले होते. सततच्या ८-१० महिन्यांच्या दिल्लीला कृषिमंत्रालयाच्या पाठपुराव्यानंतर राजीनामा मंजुरीचे पत्र शेवटी वर्गीस यांना मिळाले. नवी नोकरी मिळेपर्यंत कैरा जिल्हा सहकारी दुग्धोत्पादन संघाला मदत करण्याची त्रिभुवनदास यांची विनंती वर्गीस यांना मान्य करावी लागली. त्रिभुवनदास यांचे नेतृत्व, त्यांच्या शब्दांत असलेली एक प्रकारची पकड यामुळे नकार देणे काही वर्गीस यांना जमले नाही.

त्यावेळी कैरा सहकारी संस्थेतील जुनी यंत्रसामग्री बदलून नवीन यंत्रे मागवावीत असा सूचनावजा सल्ला वर्गीस यांनी त्रिभुवनदास यांना दिला. झाले! त्रिभुवनदासांनी वर्गीस यांनाच ती जबाबदारी देऊन मुंबईला पाठवले.

अशा प्रकारे त्रिभुवनदासजींनी या ना त्या कारणास्तव वर्गीस यांना इतरही कामांत गुंतवले व हेही पटवले, की इथेच आणंदला राहिल्यास त्यांच्या व्यावसायिक कौशल्याची

मदत होईल व शेतकरी त्यांचे ऋणी राहतील. त्रिभुवनदास पटेल यांच्या प्रेरणेमुळे (व डॉ. वर्गीस कुरियन यांच्या नशिबामुळे) वर्गीस यांनी आणंदला राहण्याचा व कैरा दुग्धोत्पादक संघासाठी काम करण्याचा विचार केला. डॉ. कुरियन यांच्या मते, आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या धड्यांपैकी हा एक होता. त्यांच्या मते, केवळ स्वत:च्या फायद्याकरता काम केले तर मिळणारा आनंद हा क्षणभंगूर असतो, परंतु इतरांसाठी जेव्हा तुम्ही काम करता, तेव्हाचे परिपूर्तीचे समाधान हे अधिक गहिरे असते आणि हा व्यवहार तुम्ही नेटकेपणाने हाताळला तर मिळणारा पैसाही गरजेपेक्षा अधिक असतो.

१९५० साली वर्गीस यांनी कैरा दुग्धोत्पादक संघाच्या सरव्यवस्थापकपदा-साठीची सूत्रे हातात घेतली. ही संस्था शेतकऱ्यांमध्ये आर्थिक स्वावलंबन निर्माण होण्याच्या दृष्टिकोनातून कामे करत असे. प्रत्येक आव्हानामध्ये एक संधी दडलेली असते या उक्तीनुसार, नवराष्ट्राच्या उभारणीच्या कार्यात शेतकऱ्यांसाठी जी काही मदत लागेल ती देऊन त्यांच्या मार्गात येणारी आव्हाने पेलण्याची पूर्णपणे तयारी आता कुरियन यांनी करून टाकली होती. १९४८ साली सुरू झालेल्या कैरा जिल्हा दूधउत्पादक संघाला ५ वर्षे पूर्ण झाली होती. रोजच्या २०० लिटर दुधाच्या संकलनावरून आता संस्था २०,००० लिटरचे दूध संकलित करू लागली होती. हा प्रगतीचा पहिला टप्पा होता. याच काळात बॉम्बे मिल्क स्किमच्या दुधाची मागणीसुद्धा वाढतच होती. खेड्या-खेड्यामध्ये दूधउत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ शकत होते, त्याचे संकलन करण्याच्या दृष्टिकोनातून आधुनिक डेअरी उभारावी अशी कल्पना आता वर्गीस यांच्या डोक्यात तयार झाली होती. परंतु त्याकरता आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यवस्थापकीय कौशल्य आवश्यक होते. माणसाने विचार करावा आणि मनाजोगे घडावे असे बऱ्याचदा होते. योगायोगाने त्याकाळी केंद्रीय अर्थमंत्री सी.डी. देशमुख आणि कृषिमंत्री के.एम. मुन्शी यांची आणंदला धावती भेट झाली आणि कुरियन यांना न्यूझीलंडला जाऊन प्रशिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली. न्यूझीलंडहून आल्यानंतर दुधाची भुकटी तयार करण्याचा आधुनिक कारखाना टाकण्याची कुरियन यांची कल्पना होती. त्या सुमारास युनिसेफचे प्रतिनिधी भारतात आले होते. त्यांनी आणंदला भेट दिली आणि कारखान्याच्या उभारणीसाठी युनिसेफने मदतीचा हात पुढे केला. राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते १५ नोव्हेंबर १९५४ रोजी 'अमूल' या विश्वविख्यात डेअरीची पायाभरणी करण्यात आली तर ३१ ऑक्टोबर १९५५ रोजी, सरदार वल्लभभाई पटेलांच्या जन्मदिनी, भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते या डेअरीचे उद्घाटन करण्यात आले.

ब्रँड अमूल हा शब्द म्हणजे Anand Milk Union Limited याचे छोटे रूप होते. एके दिवशी भारताचे वाणिज्यमंत्री टी.टी. कृष्णम्माचारी यांनी आणंदला भेट दिली. वर्गीस यांचे काम बघून त्यांनी डॉ. वर्गीस यांना शब्द दिला, की भविष्यात कधीही मदत लागल्यास नि:संकोच कळवा. न्यूझीलंड डेअरी बोर्डाच्या 'अँकर बटर' या परदेशी बटरमुळे 'अमूल बटर'ला मार्केट काबीज करण्यास अडचण जाणवत होती. नेमके त्याच वेळेला वर्गीस कुरियन यांनी टी.टी. कृष्णम्माचारी यांना लोण्याच्या आयातीत कपात करण्याची विनंती केली व आश्चर्य म्हणजे तात्काळ त्याबाबत अंमलबजावणी झालीसुद्धा.

१९६२ साली भारत-चीन युद्धादरम्यान, भारतीय लष्कराला तातडीने २७५० टन दुधाची भुकटी हवी होती. जे अतिशय जिकिरीचे काम होते. परंतु आव्हानांना न भिता ते आपल्या शिंगावर घेणारे कुरियन यांनी ते आव्हान यशस्वीरीत्या पेलले आणि तेही सरकारकडून कर्ज किंवा अनुदानाशिवाय. वर्गीस कुरियन यांची राष्ट्रनिष्ठा यातून दिसून येते.

१९६६ साली 'ॲडव्हर्टायझिंग ॲण्ड सेल्स प्रमोशन कंपनी' ह्या संस्थेने 'अमूल'ची खट्याळ आणि लोभस मुलगी जन्माला घातली आणि पंचलाइन तयार झाली – Utterly butterly delicious.

अल्पावधीतच अमूलच्या यशाची पताका देशभर फडकू लागली. 'आणंद पॅटर्न' बघण्यासाठी सर्व थरांतील लोक 'अमूल डेअरी'ला भेट देऊ लागले. वर्गीस कुरियन यांचे नावसुद्धा प्रसिद्ध झाले होते. १९६४ साली सी. सुब्रमण्यम हे कृषिमंत्री असताना दिल्ली शहराला दूधपुरवठा करणारी दिल्ली मिल्क स्किम (DMS) ही संस्था मोडकळीस आली होती. केंद्रशासनाचा खच ह्या दूधसंकलन आणि वाटप करणाऱ्या डेअरीसाठी वारेमाप वाढला होता. भ्रष्टाचार, अनागोंदी आणि विस्कळीत अशा कारभाराला सावरण्यासाठी मंत्रिमहोदयांनी वर्गीस कुरियन यांना पाचारण केले. चमत्कार म्हणजे वर्गीस कुरियन यांनी केवळ ४२ दिवसांत ही संस्था पूर्णपणे बदलून टाकली.

डॉ. वर्गीस कुरियन यांच्या आयुष्यात खूप उच्च दर्जाची व्यक्तिमत्त्वे आली. त्यापैकी महत्त्वाचे म्हणजे देशाला जय जवान जय किसान अशी घोषणा देणारे भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री. ३१ ऑक्टोबर १९६४ रोजी (सरदार पटेल यांच्या जन्मदिनी) भारतातला पहिलाच अत्याधुनिक स्वयंचलित कडबाळूही (प्राण्यांचे खाद्य) कारखान्याचे उद्घाटन लालबहादूर शास्त्रींच्या हस्ते झाले. आणि १०० अब्ज लिटर दूधसंकलनाची ऑपरेशन फ्लडची कल्पना वर्गीस कुरियन यांच्या मनात नकळतपणे शास्त्रीजींनी पेरली. त्यांनी 'आणंद पॅटर्न' गुजरातेत मर्यादित न ठेवता पूर्ण देशभर पसरवावा ही इच्छा व्यक्त केली. पुढे नॅशनल डेअरी बोर्ड (NDB) ह्या संस्थेचा जन्म झाला व वर्गीस कुरियन त्याचे अध्यक्ष झाले.

ऑपरेशन फ्लड किंवा दुधाचा महापूर – खरं तर ही कल्पना पंतप्रधानाची सुचवली होती. कृषिमंत्री सुब्रमण्यमसाहेबच होते. परंतु तरीही आपल्या देशातील बाबूशाहीचा फटका मात्र डॉ. कुरियन यांना बसला. खूप पाठलाग करून, बऱ्याच लोकांना भेटूनही

शासनदरबारी मात्र निराशाच त्यांच्या हाती आली. त्याकाळात त्यांचे सहकारी म्हणजे त्यांचा मित्र दलाया (मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीतील सहकारी) आणि मायकेल हाल्स (फूड अॅन्ड अॅग्रीकल्चर ऑर्गनायझेशनमधील तज्ज्ञ तसेच हार्वर्डचा प्रशिक्षित अतिथी प्राध्यापक) हे होते. या ऑपरेशन फ्लडची चर्चा या तिघांमध्ये होत असे. मायकेलने त्याला आखीवरेखीव दस्तावेजच तयार करून टाकले होते.

ऑपरेशन फ्लड किंवा धवलक्रांती यामध्ये डॉ. कुरियन यांनी तीन टप्पे योजले होते-

१) भारतातल्या डेअरी विकासाच्या कार्यक्रमाला युरोपमधून अतिरिक्त दुग्धजन्य पदार्थांची भुकटी मिळवायची. तिचे वितरण मुंबई, दिल्ली, मद्रास आणि कोलकाता येथे करायचे. त्यातून बाजारपेठेवर कब्जा मिळवता येईन.

२) यातून मिळणाऱ्या पैशांचा यथायोग्य वापर जनावरांच्या निगराणीकरता, त्यांची संतती वाढण्याकरता. तसेच दुधाचे उत्पादन, संकलन तसेच दुग्धजन्य पदार्थ बनवण्याकरता करायचा.

३) बाजारपेठेत या दुधयोजनेचे बस्तान बसवायचे.

भारतातील मोठमोठाल्या गोठ्यांतून हा प्रकल्प राबवणे हा डॉ. कुरियन यांचा हेतू होता. दूधउत्पादनाला आपल्या पायावर उभे राहण्यासाठी हे ऑपरेशन फ्लड कारणीभूत ठरले. देशातील २२ राज्यांत १.१ कोटीपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या मालकीच्या २०० पेक्षाही कितीतरी जास्त डेअरीज् आहेत. त्यातून २ कोटी लिटर दुधाचा वापर रोज केला जातो. १९५५ साली आपण दरवर्षी ५०० टन लोणी आयात करत होतो. आज आपण १२००० टन लोण्याचं उत्पादन करतो. बॉलिवूडनेही या ऐतिहासिक प्रकल्पाची दखल घेतली. श्याम बेनेगल या प्रख्यात निर्मात्याने 'मंथन' नावाच्या सुपरहिट चित्रपटाची निर्मिती केली.

शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवणारे, जगामध्ये भारताचे नाव झळकवणारे, आयातीच्या माध्यमातून परकीय चलन परदेशात जाते, ते रोखण्यासाठी दूध व दुग्धजन्य पदार्थांचा महापूर आणणारे, गावा-खेड्यांच्या विकासासाठी झटणारे करोडो लोकांचे जीवनमान उंचावणारे डॉ. वर्गीस कुरियन यांना आयुष्यात बहुमान खूप मिळाले.

रॅमन मॅगेसेस (१९६३), पद्मश्री (१९६५), पद्मभूषण (१९६६), कृषीरत्न पुरस्कार (१९८६), वॉटलर पीस (१९८६), वर्ल्ड फुड प्राइज (१९८९), डेअरी मॅन ऑफ द इयर (१९८९), देशाचा सर्वोच्च द्वितीय नागरी पुरस्कार पद्मविभूषण (१९९९)

डॉक्टर वर्गीस यांनी ३० पेक्षा जास्त संस्थांना जन्म दिला. अमूल/गुजराथ सहकारी दूध विपणन महासंघ (GCMMF)/राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ (NDB)/ग्रामीण व्यवस्थापन संस्था (IRMA) आदी.


त्यांच्या निधनाने एका महान व्यक्तिमत्त्वाला देश भुकेला आहे.

**- देवेंद्र जैन**
२०२, शिवाजी चौक,
अंबरनाथ (पूर्व), जिल्हा ठाणे
९३७११५३७३७
deepdevn21@gmail.com


## २ ऑक्टोबर २०१२ रोजी प्रसिद्ध झाले!

# दि मॅन इन ऑलिव्ह ग्रीन्स

## सुधीर नाफड




**मूल्य २२५ रु.**
**सवलतीत १३० रु.**

रात्रीचे आठ वाजले आणि 'सीझ फायर....सीझ...फायर...सीझ फायर' असे संदेश रेडीओवरून सर्वत्र घूमू लागले. हळू हळू रणगाडयाची चाके जिथल्या तिथे थांबू लागली, मशीनगन्स, बंदूकी व इतर शस्त्रे शांत होऊ लागली. आमच्या तोफा ज्या गेल्या दहा बारा दिवसात नुसत्या आगीचे लोळच्या लोळ शत्रूवर फेकत होत्या त्याही आता शांत झाल्या होत्या. सर्वत्र एक प्रकारची भयाण आणि भीषण शांतता पसरली होती. कानाला आवाजांची इतकी सवय झाली होती की ही शांतता कानाला सहन होत नव्हती. मन अस्वस्थ होत होते. हात अजूनही बंदूकीच्या ट्रिगरवर, तोफांच्या खटक्यांवर शिवशिवत होते, मनाला अजूनही पटत नव्हते की युध्द समाप्त झाले आहे.

# मराठी साहित्य-संस्कृती संमेलन पण लक्षात कोण घेतो?

**स्मिता भागवत**

बहुचर्चित टोरोंटो संमेलन, साहित्य महामंडळाच्या सहकाराविना थाटात पार पडले. संमेलन होणार नाही नि झाल्यास त्यास स्थानिक संमेलनाहून अधिक महत्त्व नाही, हे ठासून सांगितले जात असून! त्यास गल्ली संमेलनाच्या पातळीस उतरवले तरी! भारतातील वृत्तपत्रात दाहक प्रतिक्रिया आल्या. मला कुतूहलयुक्त इमेल्स येऊ लागल्या. संमेलनाच्या कार्यकारिणीत मी नव्हते, की नव्हता कार्यक्रमात माझा सहभाग! तटस्थ प्रेक्षकाच्या भूमिकेतून मी संमेलन यशस्वी करणाऱ्या कार्यकर्त्यांचे कौतुक केले. इ-सकाळच्या 'पैलतीर'मध्ये ते छापून आले. प्रतिक्रिया सदरात योग्य/विनोदी प्रतिक्रिया येतात. काहींना मी कुणाला सोकोल्ड साहित्यिक म्हणणे आवडले नाही. त्यांनी हे ठरवायचा अधिकार स्मिता भागवतला कुणी दिला, हा प्रश्न विचारून, त्या महान लेखिका नाहीत, अशी प्रतिक्रिया लिहिली. प्रेक्षकाची भूमिका स्पष्ट केलेली असून! मताधिकार प्रत्येकास असतो, हे विसरून! मत मांडण्यासाठी लेखक असावे लागत नाही, असे लिहून काही वाचकांनी इ-पत्त्यावर संमेलनाच्या सविस्तर वर्णनाची मागणी केली. मी समुपदेशक! संमेलनाचे वर्णन करून समाधान न पावणारी! घडले ते कसे घडले, याचा शोध आवश्यक ठरवणारी! म्हणून मी कार्यकारिणीच्या समस्या जाणून घेतल्या. तरी हा संमेलनाचा तटस्थ लेखाजोखा आहे हे आवर्जून सांगावेसे वाटते.

कॅनडा सुंदर सुसंस्कृत देश आहे. महाराष्ट्रातील साहित्यिकांनी तो पहावा, इथल्या बांधवांनी कॅनडास कर्मभूमीचा दर्जा दिला तरी अस्सल मराठीपण जपले आहे, याची दखल घ्यावी; ही माफक मनीषा! महाराष्ट्राचा झेंडा टोरांटोत फडकावण्याचे गोड स्वप्न जोजवणाऱ्या कार्यकर्त्यांचा उत्साह दांडगा होता. साहित्यिक संवेदनशील असतात, असे समजून त्यांनी मायदेशी साहित्यिकांना रिझवण्याचे मनसुबे रचले. देशी आणि विदेशी मराठी समाजाची नाटके, संगीत, नृत्ये व माहितीपूर्ण परिसंवाद, चर्चासत्रे अडीच दिवसांचे अधिवेशन अविस्मरणीय करतील यात शंका नव्हती. पण ही मराठमोळी इच्छा पूर्ण करतानापण नावाचे अनेक पत्थर आड आले.

टोरांटोस विश्व मराठी साहित्य संमेलन होणार, हे दोन वर्षांपूर्वी ठरले. मोठ्या इव्हेंटची तयारी करण्यास इतका काळ गरजेचा असतो म्हणून! पण हे संमेलन सतत विघ्नांच्या गराड्यात! टोरांटोस कुणाला आणायचे हे महामंडळ ठरवते! आधी त्यांचे पदाधिकारी! मग महामंडळ साहित्यिकांची निवड करणार! विश्व मराठी साहित्य संमेलनास येणाऱ्यांच्या तिकिटांपोटी महाराष्ट्र सरकार ग्रांट देते. राहण्या-जेवण्याचा खर्च यजमान देशाने करायचा. आधीच्या सर्व संमेलनास अशी ५० लाखांची ग्रांट मिळाली. सिंगापूर या नजीकच्या स्थळी संमेलन होते, तेव्हाही! टोरांटो फार दूर! साहित्य महामंडळाच्या त्याच मागण्या! तिकिटांपोटी महाराष्ट्र सरकारची तेवढीच ग्रांट! तरी टोरांटोकर उत्साहात होते. भारतातील कॉसमॉस बँक (१५ लाख), कोलते पाटील बिल्डर्स (१० लाख), श्री. डी.पी. म्हैसकर (१५ लाख), सदानंद जोशी (अमेरिका) आणि कॅनडाचे संजीव देवधरे (प्रत्येकी १०००० डॉलर्स) या देणगीदारांकडून हमी मिळवून कार्यकारिणीने खर्चास तोंड देण्याची तयारी केली. सरकारची ग्रांट हाती आली नसूनही एअर इंडियाची जथ्थ्याने तिकिटे बुक केली. तिथे संप झाला. सारे बदलण्याची वेळ आली. पण...

महाराष्ट्र सरकारने संमेलन तोंडावर आले असताना ५० ऐवजी २५ लाखांचा धनादेश दिला. मधल्या काळात तिकिटांचे भाव प्रचंड वाढले. सारी तिकिटे एकदम आणि एका एअरवेजची मिळणे अशक्य झाले. तरी निभावून नेण्यास कार्यकर्ते तत्पर होते. पण साहित्य महामंडळाने सारे (साहित्यिक आणि असाहित्यिक पदाधिकारी) एका फ्लाइटने येतील वा कुणीही येणार नाही, असे म्हटले. एका कंपनीची तिकिटे मिळणे शक्य नाही, हे पटविण्यात प्रयत्नांची पराकाष्ठा झाली. पण महामंडळाने हेका सोडला नाही. संमेलनासाठी मोठे आर्ट सेंटर, भारतातून, तसेच अमेरिका, युके, कॅनडातून येणाऱ्या पाहुण्यांसाठी हॉटेलच्या खोल्यांचे आरक्षण झाले असताना, सारे रहित करायचे तर जबरदस्त कॅन्सलेशन चार्जेसना सामोरे जावे लागणार, बॅनर्स, दिंडीसाठी केलेला पारंपरिक वस्त्राभूषणांचा खर्च, समस्यांचे रान तुडवण्यात वापरलेली शक्ती साऱ्यावर पाणी




फिरणार आणि हाती काही येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली. महामंडळाने गटागटाने येणे स्वीकारले तर हे टाळता येणार होते. पण दिवस वेगाने संपत होते आणि चर्चा मात्र संपत नव्हत्या.

शक्ती आणि आर्थिक प्रचंड खर्च वाया जाऊ नये, हा समंजस विचार टाळून महामंडळाने 'आमच्या अनुपस्थितीत ते स्थानिक संमेलन ठरेल. संमेलनास 'विश्व मराठी साहित्य संमेलन' नाव देता येणार नाही. आमचा लोगो वापरता येणार नाही', वगैरे सुनावले. भारतातील वृत्तपत्रांना संमेलनरहित झाल्याची खबर देऊन इथल्या मराठी मंडळ आणि कार्यकर्त्यांवर ताशेरे झाडले. संमेलन ४ दिवसांवर! या आडमुठ्या पवित्र्याने कार्यकर्त्यांत आव्हान पेलण्याची जिद्द प्रगटवली. त्यांनी महामंडळाने सहकार दिल्यास त्यांच्यासह नाहीतर त्यांच्याविना संमेलन करायचे ठरवले.

'मराठी साहित्यसंस्कृती संमेलन' असे नाव देऊन ठरल्या तारखेस संमेलन घडवून आणण्यास कार्यकारिणीने चंग बांधला. हे तारेवरच्या कसरतीचे आव्हान पेलण्यास बहुतांश मराठीजनांचा सहकार मिळाला. 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या काव्यपंक्तीचे साक्षात रूप इथे अवतरले असे म्हणणे अतिशयोक्तीचे नाही. कनेडियन Trillium Foundation ने ३९०० डॉलरचे अनुदान दिले. भारतातल्या देणगीदारांनी समंजस धोरण स्वीकारले. कलाकार, संमेलन पाहण्यास आलेल्या रसिकांनी आणि इथल्या नागरिकांनी हे संमेलन पार पाडण्यास कार्यकारिणीस मदत केली. टोरांटो मराठी भाषक मंडळ आणि संमेलनाच्या कामासाठी लीना देवधरे, नमिता दांडेकर, प्रविणा काळे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणारी विशेष कार्यकारिणी एकदिलाने झटली. काही बाबतींत आधी भिन्न मते व्यक्त केली होती त्यांनीही सहकाराचे महत्त्व जपले. मराठीबाणा म्हणजे अडवणूक, हे समीकरण बनवणाऱ्या आणि इतरांच्या आर्थिक, मानसिक, शारीरिक शक्तीच्या अपव्ययाचा विचार टाळून कार्यक्रमाचा बोजवारा उडवणाऱ्यांसमक्ष त्यांनी उत्तम उदाहरण सादर ठेवले, असे मला वाटते. मी कोणत्याही कार्यकारिणीत नसल्याने माझ्या मतास वजन आहे.

संमेलनाच्या नावात बदल म्हणजे फलकांपासून पाहुण्यांच्या ओळखपत्रापर्यंत सारे अडीच दिवसांत वेगाने बदलणे भाग होते. स्मरणिकेच्या प्रत्येक पानावर विश्व मराठी साहित्य संमेलनाचा लोगो! तो दूर करण्याइतका वेळ हाती नव्हता. स्मरणिकेचा खर्च आणि स्वतःचे व्यवसाय सांभाळून ७-८ महिने देखणी स्मरणिका तयार करण्यास झटलेल्या कार्यकर्त्यांच्या कष्टांवर पाणी पडले. संमेलनाची तारीख बदलली तेव्हा डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. अनिल अवचट येणार नाहीत, हे कळले होते. महामंडळातून येणाऱ्यांत मोजकेच साहित्यिक, इतर अधिक! चर्चासत्रे, परिसंवाद रटाळ करण्याची शक्यता निर्माण करणारे! अशांच्या अनुपस्थितीमुळे रटाळपणाचा डाग न लागता संमेलन पार पडले. अर्थात ना.धों. महानोरांचा परिचय करून घेण्याची संधी हुकली, याची रुखरुख अवश्य होती.

पहिली संध्याकाळ उद्घाटन, गुरुवंदना आणि स्थानिक कलाकारांच्या कलाविष्काराने सुरू झाली. या कार्यक्रमासाठी लिबरल पार्टीच्या दीपिका डामेर्लो आल्या होत्या. अमराठी असूनही त्यांनी कागद न पाहता काही वेळ मराठीत भाषण केले. स्थानिक मराठी मंडळाच्या सल्लागार समितीचे सदस्य व्यासपीठावर होते. कॅनडा प्रत्येकाच्या संस्कृतीस मान देते, हे सूचित करायला स्थानिक मुले आणि तरुणांनी नाटुकली, कथ्थक, भारतनाट्यम, Hiphop Irish Dance, वगैरे कलाप्रकार लीलया हाताळून तीन पिढ्यांतील संवाद कलात्मक रीतीने सादर केला. सन्मानपूर्वक महाराष्ट्रगीत आणि दोनही देशांची राष्ट्रगीते गाऊन संध्याकाळ संपली. स्वादिष्ट जेवणानंतर कौशल इनामदार यांनी आणलेले सारेगामापाचे मोना कामत, जयदीप बुगवाडकर नि स्थानिक गायकांच्या मदतीने चित्रपट शतकाच्या संदर्भात संगीतधमाका रंगवला.

दुसऱ्या दिवसाच्या भरगच्च कार्यक्रमांची सुरुवात झाली वैभवी ग्रंथदिंडीने. स्थानिक तरुण-तरुणींनी पारंपरिक वेशात, लेझीमच्या तालावर ग्रंथदिंडी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या भव्य हमार्सन सभागृहात आणली. त्यांना साथ लाभली मुंबईच्या ज्ञानाई सांस्कृतिक मंडळाच्या भजनी मंडळाची. कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष शशिकांत बुगदे यांनी उद्घाटन केले. त्यावेळी व्यासपीठावर कॉसमॉस बँकेचे संचालक जयंत शाळिग्राम, २०१३ साली बोस्टनला

होणाऱ्या BMM अधिवेशनाचे अध्यक्ष आशीष चौघुले, संमेलनाच्या निमंत्रक लीना देवधरे, ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे उपस्थित होते. शशिकांत बुगदे म्हणाले, ''संमेलन होण्यापूर्वी भारतात जो गोंधळ झाला तो आपल्या संस्कृतीस शोभनीय नाही. विपरीत परिस्थितीत टोरांटोच्या मंडळींनी काही वर्षे जी मेहनत घेतली ती विचारात घेऊन आम्ही त्यांना साथ देणे कर्तव्य समजलो. संमेलनात कोण आले नाही, यापेक्षा संमेलन होणे अधिक महत्त्वाचे आहे.''

आशीष चौघुले म्हणाले, ''जात्यावर बसलेली बाई ओवी करते म्हणजे प्रत्येकात साहित्यिक दडलेला असतो. आपल्यात दडलेल्या साहित्यिकांच्या रूपाने इथे साहित्यिक उपस्थित आहेत, हा आनंद जास्त महत्त्वाचा!''

संमेलनाच्या निमंत्रक लीना देवधरे म्हणाल्या, ''साहित्य महामंडळाचा सहकार मिळाला असता तर आमच्या दोन वर्षांच्या मेहनतीचे अधिक चीज झाले असते. तरी जे आले आहेत त्यांचे महत्त्व जपून सारे कार्यक्रम नेमस्तपणे पार पाडण्यात येतील.''

नटवर्य डॉ. मोहन आगाशे म्हणाले, ''साहित्य संमेलन फक्त साहित्यिकांचे नसते. ज्यांच्या जिवावर ते मोठे होतात, त्या वाचकांसाठीही संमेलन असते. या संमेलनावर ही मंडळी उद्या कादंबरी लिहितील. आपण त्यांना प्रोत्साहन देऊ.''

नंतर 'बदलते नाटक' या विषयावर परिसंवाद झाला. डॉ. मोहन आगाशे, ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके आणि योगेश सोमण यांनी भाग घेऊन परिसंवाद रसाळ आणि माहितीप्रद केला.

भारतातील साहित्यिकांचा सहभाग असलेल्या परिसंवादाचा प्रश्न पूर्णपणे सुटला नव्हता. गावोगावी 'संसारी लोणचे' हा एकपात्री कवितांचा कार्यक्रम गाजवणाऱ्या स्वाती सुरंगळीकर संमेलनास आल्या होत्या. रिकाम्या राहिल्या वेळात स्वातीताई 'संसारी लोणचे' हा अर्ध्या तासाच्या कार्यक्रम करतील का, हे विचारण्यात आले. त्यांनी निराश केले नाही. आदल्या रविवारी माझ्याकडे त्यांचा साहित्यप्रेमी मंडळात 'एका कवयित्रीची स्मरणयात्रा' हा दोन तासांचा बहारदार मुलाखतीचा कार्यक्रम झाला होता . त्यात उपस्थित राहू न शकलेले रसिक हळहळत होते. त्यांना संमेलनात अर्ध्या तासाचा कार्यक्रम पाहण्याची संधी मिळाली. 'आकाश पेलताना' या नीला सत्यनारायण यांच्या कवितांवर बेतलेल्या अप्रतिम नृत्यनाटिकेचे सूत्रसंचालन करण्याची त्यांना विनंती करण्यात आली. अचानक समोर आलेले ते आव्हान स्वाती सुरंगळीकर यांनी उत्तम पेलले. या नृत्यनाटिकेत कथ्थक आणि भरतनाट्यम या दोन्ही प्रकारांत ४-४ मुलींनी कलाविष्कार सादर केला. इथे नृत्याचे वर्ग भरवणारी मूळ दक्षिणेची पण मुंबईतली, मराठी उत्तम जाणणारी मालती आणि नमिता देवधरे यांनी कोरिओग्राफीची बाजू सांभाळली.

शिवाय 'कौशलकट्टा' आणि 'आनंदडोह' हा योगेश सोमण यांचा भारतात गाजलेला, तुकाराममहाराज आणि त्यांची पत्नी आवलीवर आधारित एकपात्री हृदयस्पर्शी कार्यक्रम होता. कौशलकट्ट्यात मोना कामत आणि जयदीप बुगवाडकर या गायकांना स्थानिक कलाकारांची साथ लाभली. 'चाकोरीबाहेरील लेखन' या चर्चासत्रात वसंत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर, अमेरिकेचे सुधीर कुलकर्णी आणि स्थानिक चित्रा पोतनीस यांनी भाग घेतला. रात्री मुक्ता बर्वे आणि गिरीश जोशी यांनी लोकप्रिय 'फायनल ड्राफ्ट' नाटक सादर केले.

तिसरा दिवस इथल्या मराठी शाळेच्या बालचमूंच्या सादरीकरणाने सुरू झाला. नंतर होती मुक्ता बर्वे या अभिनेत्रीची रंगतदार मुलाखत! 'फायनल ड्राफ्ट' नाटक आणि इथे बघितल्या जाणाऱ्या 'एका लग्नाची दुसरी गोष्ट' या मालिकेमुळे रसिकांना खूप उत्सुकता होती, तशीच बदलत्या नाटकाचे दर्शन घडवणाऱ्या योगेश सोमण यांच्या 'याला नाटक म्हणतात राजा' विषयीही! मुळात मराठी नाटकातील बदलते टप्पे बघणे हा सुखानुभव. स्थानिक तरुणाईस लाभलेले योगेश सोमण यांचे दिग्दर्शन, यामुळे औत्सुक्य शिगेस पोहोचलेले. योगेशजींनी घेतलेल्या मेहनतीचे इथल्या तरुणाईने चीज केले. सखाराम बाईंडर, नटसम्राट, रायगडला जेव्हा जाग येते, शांतता कोर्ट चालू आहे वगैरे महत्त्वाचे टप्पे ठरणाऱ्या नाटकांच्या प्रतीकप्रवेशांचे सादरीकरण प्रभावी झाले. शाबासकर भजनी मंडळाचा कार्यक्रम रंगतदार झाला.

डेट्रॉईटच्या कलाकारांनी 'एक कविता हरवलेली' कार्यक्रम केला. अर्काटकर दांपत्याने खूप चिकित्सकपणे कवितांची निवड आणि सुरेल स्वररचनेच्या मदतीने कार्यक्रम देखणा केला. खूपदा तबला स्वरावर अतिक्रमण करून संगीताची लज्जत कमी करतो. या कार्यक्रमात पूर्वा पेंडसे या पुरंध्रीने हळुवार तबलावादन करून शब्द-स्वरांची नजाकत वाढवली.

अमेरिकेच्या कवयित्री नीलिमा कुलकर्णी यांनी कवीसंमेलनाचे लालित्यपूर्ण सूत्रसंचालन केले. वसंत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर, स्वाती सुरंगळीकर, स्थानिक अर्चना मेढेकर, आदित्य आजगावकर कवी संमेलनात सहभागी झाले. आदित्य आजगावकरचे वय आणि कवितेतील तारुण्यसुलभ जोश दाद मागणारा होता. कवी संमेलनापूर्वी स्वाती सुरंगळीकर यांच्या 'सुख पारा' या नव्या कवितासंग्रहाचे आशीष चौघुले यांनी प्रकाशन केले.

समापनात औपचारिक कार्यक्रम ठरणारे आभारप्रदर्शन असते. या संमेलनात औपचारिकतेसही झळाळी प्राप्त झाली. संयोजिका लीना देवधरेने कार्यकारिणीचे आभार मानण्याचा उपचार पाळला. ऐनवेळी मदतीस धावलेल्या स्थानिक तसेच अमेरिकेहून आणि भारतातून आलेल्या हितचिंतकांचे आभार मानून त्यापुढे सरकल्या. अपार अडवणुकीने, काही झाले तरी हे संमेलन करायचेच या जिद्दीची ठिणगी पेटवली आणि आम्हाला आमच्या क्षमतेची जाणीव झाली. ही जाणीव करून देणाऱ्या हितशत्रूंचे

मनःपूर्वक आभार! तरी हे बोलताना त्यांचे डोळे पाणावले होते नि कंठ भरून आला होता. त्या अश्रूत सारे निभावून नेण्याची कृतकृत्यता, साह्य करणाऱ्यांविषयी कृतज्ञता आणि जे होऊ शकले नाही त्याबद्दल अगतिक दिलगिरी यांचा त्रिवेणी संगम होता.

रात्री 'काटकोन त्रिकोण' या प्रेक्षकांना खुर्चीस खिळवणाऱ्या नाटकाने संमेलनाची सांगता केली. संमेलनाच्या आठवणी स्मृतींच्या कुपीत भरून प्रेक्षक पांगले. हा स्मृतिसुगंध सर्वांना खूप काळ पुरणार आहे. आणि काही कटू स्मृतीही!

संमेलनात चंद्रपूर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डाहके व प्रभा गणोरकर उपस्थित होत्या. दुबई विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष संजीवनी पाटील सक्रिय सहभागी होते. एकता त्रैमासिकाचे विनायक गोखले सपत्नीक उपस्थित होते. एकताच्या लेखिका सुधा खडकीकर मॉंट्रियलहून आल्या होत्या. अमेरिकेहून BMM च्या २००१च्या अधिवेशनाच्या अध्यक्ष शैला विद्वांस, २०१३ चे अध्यक्ष आशीष चौघुले, कवयित्री अनु अमलेकर, नीलिमा कुलकर्णी हजर होते. शिवाय भारत, अमेरिका, यु.के, टोरांटोबाहेरील कॅनडातून आलेल्या अनेक रसिकांनी या संमेलनाचा मनसोक्त आनंद लुटला. स्मरणिका मिळाली नाही असा गळा न काढता, हे संयोजकांच्या अक्षमतेचे प्रतीक नसून, ऐनवेळी कोंडीत धरणाऱ्या असाहित्यिक वर्तनाचे फलित आहे, हे समंजसपणे प्रेक्षकांनी समजून घेतले.

हल्ली 'ओपिनियन पोल'ला महत्त्व असते. म्हणून अनायासे कानावर पडलेली मते सादर करावीशी वाटतात. भारतातून आलेले 'कौशलकट्टा', 'फायनल ड्राफ्ट' तसेच 'काटकोन त्रिकोण' या नाटकांत काम करणारे कलाकार, मुक्ता बर्वे या कलावतीची मुलाखत, बदलत चाललेल्या नाटकाच्या संदर्भात डॉ. मोहन आगाशे यांचे तसेच वसंत आबाजी डहाके, प्रभाताई गणोरकर यांचा सहभाग, उत्तर अमेरिकेतून तसेच युकेहून साहित्यिक आलेले असताना हे वैश्विक संमेलनच होते. स्वतःस विश्व समजणाऱ्या हट्टाग्रहींच्या हट्टाखातर संमेलनाचे नाव बदलले तरी!

विविध देशांतून साहित्यिक नि रसिक श्रोते आले असताना, केवळ मोजके साहित्यिक नि बहुतांश असाहित्यिक उपस्थित नसल्यामुळे त्यास विश्व मराठी साहित्य संमेलन नाव देता येऊ नये, हे बहुतेकांना बालिश व हास्यास्पद वाटले. काहींनी येत्या संमेलनाच्या चर्चासत्रासाठी 'डबक्यास विश्व समजणाऱ्या मोजक्या लोकांनी संमेलन भरवणे अर्थपूर्ण आहे का?' हा विषय सुचवला. या संमेलनाचे यश पाहून मराठी समाजाने प्रगल्भ व्हावे, अशी आशा व्यक्त केली.

या यशस्वी संमेलनाने मराठी समाजाच्या डोळ्यांत अंजन ठरणारे अनेक प्रश्न निर्माण केले. विशिष्ट लोकांची हजेरी म्हणजे कृतकृत्यता, हा बुझ्र्वा विचार नाही? महाबळेश्वरच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात लाजिरवाण्या रीतीने आनंद यादव यांची अध्यक्षपदावरून हकालपट्टी केली तरी कौतुकरावांना अध्यक्ष करून संमेलन पार पडले. मग या संमेलनाचे नाव बदलून तयार स्मरणिकेचा विध्वंस का वाजवी ठरवला? सर्व निर्णयांची सूत्रे स्वतःकडे ठेवणारे साहित्य महामंडळ लोकशाही तत्त्वांची गळचेपी का करते? कोणत्या विश्व मराठी साहित्य संमेलनात ते समाधान पावले? त्यांच्या तक्रारी (की कांगावा?) खऱ्या नि संयोजकांचे प्रश्न खोटे? इकडच्या मंडळींचे चुकले असेल; पण त्यांची परक्या भूमीवरची धडपड समजून घेत मधला मार्ग काढण्याचा पोक्त विचार न करता आपलेच खरे करणाऱ्या मंडळास साहित्य महामंडळ न म्हणता फक्त 'महा इगोइस्टिक' म्हटले तर लोकांची चूक? त्याच त्या असाहित्यिकांना ते जग-प्रदक्षिणा घडवू इच्छित असतील आणि महाराष्ट्र सरकार त्यांचा प्रवासखर्च देत असेल तरी यजमान देशांवर या असाहित्यिकांचा राहण्या-जेवण्याचा खर्च पडतो. ते नजरेआड करून खर्च सोसणाऱ्या यजमान देशांवर गरीब महाराष्ट्राकडून पैसे उकळले असा आरोप का होतो? महाराष्ट्रातील धेडांच्या इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या-मराठी न बोलणाऱ्या- मुलांपेक्षा इथली तरुणाई अधिक मराठीप्रेमी आहे, हे त्यांना कळेल? संमेलनास स्थानिक संमेलन म्हटल्याने त्याचे महत्त्व खरोखर कमी होते? इथल्या तरुणाईचे मराठीप्रेम बघणे नाकारून NRI लोकांचे मराठी प्रेम पुल आणि वपुंशी फ्रीज झाले आहे, म्हणत पूर्वग्रहास वश होणाऱ्या कुपमंडूक मराठी समाजाने उघड्या डोळ्याने काय बघितले? महाराष्ट्रात उत्तम मासिके बंद पडली पण 'एकता' ३२ वर्षांहून अधिक काळ उगीच चालते? इथे संगीत, साहित्य सारे असून इथली प्रजा मराठी मातीतील लोकांना प्रेमाने निमंत्रण धाडते. तिथल्या लोकांनी इथल्या प्रणाली माहिती नसल्याने झालेल्या चुका न स्वीकारता 'डॉलर्सच्या जोरावर आमचा अपमान केला,' असा गळा काढण्यात अर्थ आहे? गंभीरपणे विचार करण्याची वेळ अजून किती दूर आहे?

विचारी समाजास या संमेलनाचा विषय चर्वितचर्वण करण्यास खूप काळ पुरणार आहे. NRI ना देशद्रोही, म्हणणाऱ्या उथळ लोकांना मराठी समाज ढापणे काढणार की अहंकार आणि भ्रष्टाचार म्हणजेच महाराष्ट्र, हे समीकरण करणार हा विदारक प्रश्न विचारावासा वाटतो. बेगडी मराठीपणाचे कवच भेदून प्रगल्भ होण्याची गरज त्यांना दिसली तरच हे होईल. नाहीतर कोणे एकेकाळी; 'टिळक श्रेष्ठ की आगरकर' हा वाद रंगत असे, त्याची ही वर्तमान आवृत्ती ठरेल. काय घडेल हे काळच ठरवणार! तरी या संमेलनाच्या संदर्भात काही डोळस प्रतिक्रिया सादर होत आहेत, ते पाहून आशेस नक्की जागा आहे, असे वाटते. आपण आशेचा दीप तेवत ठेवायचा. इतिश्री अडचणीची दौड ठरलेल्या यशस्वी संमेलनाची कहाणी सुफल संपूर्ण!

**स्मिता भागवत**
smitacap@gmail.com

# ईटी ॲट थर्टी

## अपर्णा पाटील

ईटी सिनेमाला तीस वर्षं पूर्ण होताहेत. त्यानिमित्ताने दिग्दर्शक स्टिव्हन स्पिलबर्ग पुन्हा एकदा मूळ सिनेमा लोकांनी पाहावा, यासाठी त्याची डीव्हीडी आणि ब्ल्यू रे रिलीज करणार आहेत. सिनेमा काहींनी पाहिला असेल, काहींना उत्सुकता असेल, पण त्याविषयी लिहिण्याचं एक वेगळं कारण आहे. कारण नाही, तर खंतच आहे...

ई. टी. म्हणजेच एक्स्ट्रा टेरेस्ट्रियल. पण या सिनेमाचा उल्लेख नेहमी ईटी असाच केला जातो. १९८२ मध्ये अमेरिकन साय-फाय सिनेमा आला, स्टिव्हन स्पिलबर्ग या दिग्दर्शकाच्या अनेक माइलस्टोन सिनेमांपैकी एक. 'जॉ' या सिनेमामुळे हॉलिवूडमध्ये स्टिव्हन स्पिलबर्ग हे प्रस्थापितांपैकी एक नाव झालं. पुढे स्टिव्हन स्पिलबर्ग 'जॉ'सारखे अनेक धक्के देत प्रेक्षकांना रिझवत राहिलाय. जॉ सिनेमा आला, १९७५ मध्ये. महासत्तेचं स्वप्न पाहत अख्ख्या जगाला बंदुकीची ताकद दाखवणाऱ्या अमेरिकन माणसांच्या मनातली 'मूर्तिमंत भीती उभी' नावाचं जे प्रकरण स्पिलबर्गनं 'जॉ'मधून उभं केलं त्याला तोड नव्हती. स्पिलबर्गला सिनेमातून अमेरिकन माणसाला हलवून टाकणारे विषय मांडण्याचा जणू तेव्हापासून चस्काच लागला. 'रेडर ऑफ द लॉस्ट आर्क'साठीचं काम संपताच एक नवा सिनेमाचा घाट त्यानं घातला होता. अनेक दिवसांपासून त्याच्या डोक्यात भणभणत असलेला विषय होता, ईटीचा.

परग्रहवासी, हा नवा कुतूहलाचा विषय अमेरिकन माणसाला सापडला होता. 'स्टार वॉर्स'सारख्या विषयानं अमेरिकन राजकारण आणि समाजकारण दोन्हीही ढवळून निघालं होतं. सिनेमातही त्याचं प्रतिबिंब दिसणं साहजिक होतं. जगात महासत्ताधीश कोण हे मिरवण्याची एकही संधी अमेरिका आणि रशिया यांच्यातला एकही जण गमावू इच्छित नव्हता. त्यांच्या अमर्याद इच्छेला पृथ्वीचा महाकाय आकारही कमी पडायला लागला. त्यातून अंतराळ भेदण्याची स्पर्धा जन्माला आली. अशाच संशोधनात परग्रहावरही आपल्यासारखी माणसं असतील का, तीही आपल्याइतकीच प्रगत. त्यातून अवकाशातून परग्रहावरून काही उडत्या तबकड्या येत असल्याचं सांगणाऱ्या घटनांची लाट पसरली रोज वर्तमानपत्र, रेडिओ, टीव्हीवरून अशा बातम्यांचा रतीब घातला जात असे. अमेरिकन माणसांवर विशेषतः टीव्ही नावाच्या नव्या खेळण्याला चिकटून बसलेल्या मुलांवर त्याचा परिणाम झाला होताच. अशाच मुलांपैकी एक असलेल्या स्टिव्हन स्पिलबर्गच्या पुढच्या सिनेमाचं बीज त्याचवेळी रुजलं.

अमेरिकेत 'परप्रांतीय' ठरलेल्या ज्युईश कुटुंबात जन्मलेला स्टिव्हन स्पिलबर्ग लहानपणापासून कॅमेऱ्याशी दोस्ती करून बसला होता. वयाच्या तेराव्या वर्षी त्यानं पहिली फिल्म बनवली होती. चाळीस मिनिटांची ती वॉर फिल्म स्टिव्हन स्पिलबर्गच्या भविष्यातल्या दिग्दर्शनाची पहिली पायरी होती. पण याच स्टिव्हनच्या आयुष्यातला बालपणीचा काळ सुखाचा राहिला नाही, तो त्याच्या आईवडिलांच्या विभक्त होण्याच्या निर्णयानं. स्टिव्हनच्या आयुष्यातला तो काळ एकाकी होता. कारण तो त्याच्या वडिलांबरोबर एकटाच राहिला होता. तर त्याची आई त्याच्या बहिणींसह. मस्तीखोर स्टिव्हन अचानक कोषात गेला. तो आपल्या कल्पनेतल्या दोस्ताशी आपलं मन मोकळं करायला लागला. त्यामुळेच जेव्हा 'रेडर ऑफ द लॉस्ट आर्क'साठी काम करताना मुलांच्या गराड्यात राहिला तेव्हा लहानपणीच्या त्या आठवणी पुन्हा उचंबळून आल्या. आपल्याच बालपणीच्या त्या कल्पनेतल्या मित्राची गोष्ट सिनेमात मांडावी, असं त्याला वाटायला लागलं. त्यातून 'ग्रोन अप' नावाचा सिनेमा काढावा, असं ठरलं. पण उडत्या तबकड्या म्हणजेच यूएफओवरचा 'क्लोज ऑफ द थर्ड काइंड' सिनेमा करताना, कल्पनेतला दोस्त म्हणजे एखादा परग्रहवासी असावा, अशी जोडकल्पना त्याला सुचली. यावरून आपण सिनेमा काढू असं त्यानं पटकथालेखक मेलिसा मॅथिसन हिला सांगितलं. या सिनेमाचं नावही ठरलं, 'नाइट स्काइज'.

स्टिव्हनच्या कल्पनेवरून पटकथेचं आव्हान मेलिसानं स्वीकारलं. अंतराळातून आलेला एक परग्रहवासी पृथ्वीवरच राहून जातो, त्याची एका ऑटिस्टिक मुलाशी दोस्ती होते. अशा या विषयावरच्या सिनेमाची पटकथा लिहायला मेलिसाला तब्बल आठ आठवडे लागले आणि स्टिव्हनला पसंत पडायला फक्त काही मिनिटं. काही पात्रांना, प्रसंगांना कात्री लावत स्टिव्हननं नवा ड्राफ्ट




करायला लावला. त्यात स्टिव्हननं सुचवलेला आणि या सिनेमातला सगळ्यात जास्त आवडलेला बिअर पिण्याचा प्रसंग समाविष्ट केला गेला.

स्पिलबर्गनं सिनेमा करायचं ठरवलं तेव्हा त्याला जे जे सर्वोत्तम ते ते करायचं होतं. या सिनेमातला परग्रहवासी नेमका कसा असावा, याविषयी त्याच्या डोक्यात काही कल्पना होत्या. त्यामुळेच कार्लो रम्बाल्डीला त्यानं ईटी कसा असावा हे सांगितलं. रम्बाल्डी 'क्लोज ऑफ द थर्ड काइंड'च्या वेळी त्याचा सहकारी होता. त्यानं तयार केलेला परग्रहवासी म्हणजेच ईटीचा चेहरा कार्ल सँडबर्ग, जो अल्बर्ट आइनस्टाइन, अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्यावर बेतलेला होता. तर 'वुमन ऑफ डेल्टा'वरून त्याची मान लांबोडकी करण्याचा घाट घातला गेला. ईटीचा आकार-उकार कसा असावा याचा अभ्यास करताना स्टिव्हननं कुठेच तडजोड केली नव्हती. निर्मात्या कॅथलिन केनडीला तर खरे आणि काचेचे डोळे कसे असतात याचा अभ्यास करायला त्यानं आय इन्स्टिट्यूटमध्ये पाठवलं होतं. तिने मग तिथल्याच एका कर्मचाऱ्याकरवी ईटीचे डोळे करवून घेतले. प्रेक्षकांची नजर त्याच्यापासून जराही विचलित होऊ नये, यासाठीच हे सारं काही केलं गेलं.

एकदा का ईटी कसा असावा याचा अंदाज आल्यानंतर त्यानुसार पेहराव आणि रंगभूषा करणं सहज शक्य झालं. पण चालता-बोलता ईटी कसा तयार करणार? आजच्यासारखं त्यावेळी ग्राफिक्स आणि ॲनिमेशनचं तंत्र विकसित झालेलं नव्हतं. उंचीनं कमी असलेल्या दोघांना या भूमिकेसाठी निवडण्यात आलं. दोघं अशासाठी की काही दृश्यांमध्ये त्याच्या हातांच्याच हालचाली दिसणार होत्या तर काही प्रसंगांत तो एकूणच कसा आहे ते. ईटीच्या भूमिकेसाठी तमारा डी ट्रीक्स आणि पॅट बिलोन यांची निवड झाली. बारा वर्षांच्या मॅथ्यू डीमेरीटलाही बोलवलं गेलं, ज्याला जन्मतःच दोन्ही पाय नव्हते. मॅथ्यू आपल्या हातानं चालत असे, सिनेमातही ईटीला तशाच हालचाली जास्त होत्या.

ईटीचे हात हा सिनेमाचा आत्मा म्हणा ना, पण सिनेमात हे हात म्हणजे एका कलाकारानं घडवलेल्या पपेटचा भाग होता. इतकं करून स्टिव्हनच्या या ईटीला अनेक सिनेवितरण कंपन्यांनी नाकारलं. काहींना ईटी ओंगळवाणा वाटला तर काहींना हे असलं काही तरी पाहून मुलं घाबरतील, अशी भीतीही वाटली होती.

ईटीचा आवाज कसा असावा हे ठरवलं ते एक मजेशीर प्रकरण आहे. कानात भुंगा शिरल्यासारखा आवाज करणाऱ्या ईटीचा आवाज कॅलिफोर्नियातल्या एका आजीबाईंचा होता. पॅट वेल्श नावाच्या या आजीबाई अपेक्षित आणि ईटीच्या अचूक आवाजाच्या कसोटीवर उतरण्यासाठी रोज तब्बल दोन पाकिटं सिगारेट ओढायच्या! साडेनऊ तासांच्या त्या आवाजासाठी मानधन म्हणून त्यांनी ३८० डॉलर्स घेतले होते. ईटीच्या आवाजासाठी म्हणजेच साउंड इफेक्टसाठी तेवढंच पुरेसं नव्हतं, तब्बल सोळा माणसं आणि प्राण्यांचे आवाज रेकॉर्ड केले होते. यात स्पिलबर्गसह साउंड इफेक्ट क्रिएटर बेन बर्टच्या बायकोच्या घोरण्याच्या आवाजाचंही सॅम्पल घेतलं गेलं होतं.

सिनेमात ईटीशी दोस्ती करणाऱ्या इलियटच्या भूमिकेसाठी शेकडो मुलांची ऑडिशन घेतली गेली. जेव्हा स्पिलबर्गला मनाजोगता पोरगा मिळेना तेव्हा त्यानं सहकारी रॉबर्ट फिस्कला विचारलं. फिस्क तेव्हा इंडियाना जोन्समधल्या भूमिकांसाठी ऑडिशन घेत होते, त्यावेळी तिथे हेन्री थॉमसही आला होता. पण तिथे तो काही रॉबर्टला पसंत पडला नव्हता. पहिल्या टेस्टमध्ये तो नापास झाला पण पुन्हा एकदा संधी देताना त्याला रडण्याचा प्रसंग दिला होता. आपल्या कुत्र्याचा मृत्यू आठवून खरोखरीचा रडलेला हेन्री रॉबर्टच्या लक्षात राहिला होता. रॉबर्टने सुचवलेलं हेन्रीचं नाव सार्थ ठरल्याचं सिनेमा पाहताना पदोपदी जाणवतं राहतं.

इलियटच्या शाळेतील हेडमास्तरांची भूमिका हॅरिसन फोर्ड यांनी केली तर होती तर गर्टी या इलियटच्या बहिणीची भूमिका ड्र्यू बॅरिमूरनं केली आहे. आजची स्टार असलेली ड्र्यू जेव्हा स्पिलबर्गला पहिल्यांदा भेटली तेव्हा तिच्यातला खोडकरपणा दिसला होता.

ईटीच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली ती सप्टेंबर १९८१मध्ये, 'ए बॉयज् लाइफ' नावानं. सिनेमाच्या कथेचा प्लॉट उघड होऊ नये यासाठी स्पिलबर्गनं कमालीची काळजी घेतली. कलाकारांना संवाद वाचण्याची परवानगी होती, तेही शूटिंगच्या ठिकाणी. सेटवरच्या प्रत्येकाला ओळखपत्राची सक्तीही होती. बेचाळीस दिवस सलग चित्रीकरण झालं ते लायर्ड इंटरनॅशनल स्टुडिओमध्ये. तिथे सिनेमातला मुलगा म्हणजे इलियटचं घर उभं करण्यात आलं होतं.

एरव्ही सिनेमाचं चित्रीकरण हव्या त्याप्रकारे तुकड्यातुकड्यानं केलं जातं. पण 'ईटी'चं शूटिंग सिनेमाच्या कथेतील प्रसंगानुसार चित्रित केलं गेलं. त्यामुळे आवश्यक तो परिणाम साधता आला, जो पडद्यावरचा अद्‌भुत म्हणायला हवा. इलियट आणि ईटी यांच्यातली दोस्ती, गमतीजमती आणि शेवट, या सगळ्याच प्रवासात प्रेक्षकही तसाच गुंग होतो, तो त्याच परिणामकारकतेमुळे.

या सिनेमाला लोकांनी डोक्यावर उचलून घेतलं. तोवर 'स्टार्स वॉर्स'ने केलेल्या बॉक्स ऑफिसचा रेकॉर्ड या सिनेमाने तोडला. ११ जून १९८२ रोजी हा सिनेमा पहिल्यांदा रिलीज केला गेला. त्यानंतर १९८५ आणि २००२ मध्ये रि-रीलीज केला गेला. प्रत्येक वेळी त्याने चांगली कमाई केली. तरीही व्हिडिओ पायरसी फटका बसलेला पहिला सिनेमा म्हणूनही ईटीच्या कमाईची आकडेवारी घटल्याचं बोललं जातं. अर्थात ते सत्यही आहे.

ईटीची कमाई नुसती पैशांत मोजता येणारी नाही. ५५ व्या ऑस्कर पुरस्काराच्या नामांकनात तब्बल नऊ विभागांत या सिनेमाची दखल घेतली गेली. त्यापैकी चार पुरस्कार सिनेमाच्या वाट्याला आले. गोल्डन ग्लोबमध्ये पाच नामांकनं तर बेस्ट पिक्चरसह दोन पुरस्कार मिळाले. सॅटर्न अॅवॉर्डमध्ये बेस्ट सायन्स फिक्शन फिल्म म्हणून चार महत्त्वाचे पुरस्कार मिळालेच, शिवाय रॉबर्ट मॅक्नॉटन आणि ड्र्यू बॅरिमूर यांना विशेष बालकलाकारां-साठीचे पुरस्कार मिळाले. गोल्डन ग्लोब, सॅटर्न या महत्त्वाच्या पुरस्कारांबरोबर ग्रॅमीचा पुरस्कार संगीतकार जॉन विलियम्स यांना मिळाला. जपानमधल्या ब्ल्यू रिबन पुरस्कारात बेस्ट फॉरेन फिल्म, फ्रान्सचे सिझर अॅवॉर्ड, इटलीतील डेव्हिड डी डोनाटेलो, तर स्पेनमधील रायटर सर्कल अॅवॉर्ड अशी जगभरातल्या पुरस्कारांची बरसात या सिनेमावर झाली.

जगातल्या सर्वोत्कृष्ट सिनेमांच्या यादीत या सिनेमाचं स्थान वादातीत आहे. ही केवळ साय-फाय विषयावरची फिल्म असती तर तसं नक्कीच झालं नसतं. इलियटच्या भावविश्वाचा पसारा जगासमोर मांडताना स्पिलबर्ग किंचित आध्यात्मिक झाल्याकडे समीक्षकांनी बोट दाखवलं. जेव्हा ईटी इलियटला सोडून जातो, तेव्हा त्याच्या हृदयाकडे बोट दाखवत, मी तिथे आहे, असं सांगतो, हे वाक्य म्हणजे आध्यात्मिकतेकडे झुकणं नाही का? माणसाला अमानवी गोष्टींविषयी कितीही ओढ असली तरी अध्यात्म्याचा ध्यास असोतच, असं काहीसं स्पिलबर्गनं सांगण्याचा प्रयत्न केलाय, असं निरीक्षणही नोंदवलंय. त्यामुळेच 'ईटी' केवळ एक विज्ञानपट राहिला नाही, तो मानवी भावना व्यक्त करणारा ड्रामा झाला.

सिनेमाच्या विसाव्या वाढदिवसाला पुन्हा एकदा या सिनेमाचं नवं व्हर्जन आणलं गेलं. त्यात पोलिसांनी पाठलाग करण्याच्या प्रसंगात पोलिसांच्या हाती बंदूक देण्यात आली. अमेरिकेतल्या झपाट्यानं बदललेल्या संस्कृतीचं बंदूक हे प्रतीक मानलं जातं. तेच त्यात वापरण्यात आलं. काही स्पेशल इफेक्ट्सचा वापर करण्यात आला. दोन्ही रि-रीलीजच्या वेळी प्रेक्षकांनी तेवढ्याच उत्साहानं 'ईटी'चं स्वागत केलं जेवढं पहिल्यावेळी केलं होतं. येत्या ९ ऑक्टोबर रोजी या सिनेमाची ब्ल्यू-रे आणि डीव्हीडी रिलीज होतेय. ज्यात मूळ सिनेमा जसाच्या तसा असेल, शिवाय काही नवे ग्राफिक्सही.

ईटी या सिनेमाविषयी एवढं सगळं विस्तारानं सांगायचं कारण तो तीस वर्षांचा झालाय, एवढंच नाही. 'ईटी'ची मूळ कथा ही महान दिग्दर्शक सत्यजीत रे यांची! ईटीच्या पटकथेचं काम त्यांनी १९६७मध्ये त्यांनी पूर्ण केलं होतं. ज्या पटकथेत पहिल्यांदाच पडद्यावर साकारलेला जाणारा एलियन म्हणजे परग्रहवासी कसा असेल, याची स्पष्ट कल्पना मांडलेली होती. 'द एलियन' नावाची ती पटकथा अमेरिकेत पोहोचली होती. ती कल्पना चोरून स्पिलबर्गनं हा सिनेमा केल्याचा सत्यजीत रे यांनी जाहीर आरोपही केला. त्यावेळी स्पिलबर्गनं आपण असं काही केलं नसल्याचा आव आणला होता. ज्यावेळी ही पटकथा हॉलिवूडमध्ये आली तेव्हा तर मी शाळेत होतो, असा खुलासा त्यानं केला होता. अर्थात स्पिलबर्गचा हा चोरीचा मामला 'स्टार वीकेण्ड' मासिकानं उघड केला. त्या मासिकात स्पिलबर्गनं १९६५ मध्ये आपलं शिक्षण पूर्ण केलं होतं आणि १९६९ पासून दिग्दर्शक म्हणून कामही करायला सुरुवात केल्याचं उघड केलं होतं. पण त्यानंतर कधीही स्पिलबर्गनं याबाबत ना खुलासा केला ना आपल्या चोरीची कबुली दिली. ज्या स्पिलबर्गनं एकाहून एक अप्रतिम सुंदर सिनेमे दिले, त्याचं ईटीवर विशेष प्रेम आहे. नाहीतर तो पुन्हा पुन्हा का रिलीज करावा वाटला असता? पण स्पिलबर्गनं ही कथा ढापली नसती तर हा सिनेमा कदाचित सत्यजीत रे यांच्या नावावर असता. तमाम भारतीयांसाठी तो कायमचा ठेवा झाला असता, अशी खंत कायम राहील.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

## ज्यांना वाचनाची आवड असते ते
## ‘ललित’ मासिक आवडीने वाचतात!

# ललित

### साहित्यिक घडामोडींचा बातमीदार
### आणि ग्रंथखरेदीचा मार्गदर्शक

**दिवाळी अंकासह वार्षिक वर्गणी २२० रुपये.**
**चार वर्षांची सवलतीची वर्गणी फक्त ८०० रुपये.**

वर्गणीदार, शाळा, महाविद्यालये, वाचनालये, ग्रंथविक्रेते, सामाजिक-सांस्कृतिक आणि शासकीय संस्था, ठिकठिकाणची महाराष्ट्र मंडळे अशा ५००० ग्रंथग्राहकांकडे ‘ललित’ दरमहा नियमित पोहोचतो. सुमारे ५०,००० वाचकांच्या नजरेखालून ‘ललित’मधील जाहिराती जातात आणि ग्रंथखरेदीच्या वेळी ‘ललित’चा संदर्भ म्हणून हमखास उपयोग केला जातो.

## जाहिरात दर

**पूर्ण पान : रु. २०००.००**
**अर्धे पान : रु. १२००.००**
**पाव पान : रु. ७५०.००**

## जाहिरातीचा आकार

| | | |
|---|---|---|
| **पूर्ण पान** | : | २०.५ सें.मी. उंची x १४ सें.मी. रुंदी |
| **अर्धे पान (आडवी)** | : | १० सें.मी उंची x १४ सें.मी रुंदी |
| **अर्धे पान (उभी)** | : | २० सें.मी उंची x ७ सें.मी. रुंदी |
| **पाव पान** | : | १० सें.मी उंची x ७ सें.मी रुंदी |

### ललित कार्यालय

८, फिनिक्स, ३ रा मजला, ४५७, एस. व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई ४००००४.
दूरध्वनी : २३८२ ६२ २५
इ-मेल : ashokkothawale@majesticprakashan.com

**ग्रंथजगताशी परिचित राहण्यासाठी**
**‘ललित’चे वर्गणीदार व्हा!**

# कलाप्रवास.... आता इटली

## डॉ. माधवी मेहेंदळे

पॅरिस मागे टाकून आम्ही दोघी आता इटलीत प्रवेश करणार होतो. इटलीमध्ये रेनेसान्स काळातला कलेचा खजिना आहे असं ऐकिवात होतं. पॅरिसहून रात्रभर प्रवास करून सकाळी रोमला पोचणारी ट्रेन आम्हाला गाठायची होती.

आम्ही रेल्वेस्टेशनला पोचलो. इटलीबद्दल बऱ्याच भयकथा आम्हाला ऐकवल्या गेल्या होत्या. स्टेशनवर एका बाजूला बरीच मंडळी चक्क पथाऱ्या पसरून, खाली बसलेली दिसली.

तिथले बेंच भरून वाहत होते. मंडळी युरोपीय होती एवढंच काय ते. बाकी दृश्य आपल्याकडच्यासारखंच दिसत होतं. आम्ही दोघी एक बेंच गाठून बसलो. गाडीचा काही पत्ताच नव्हता. बऱ्याच चौकश्या केल्यावर कळलं, की अर्धा-पाऊण तास लेट आहे. तशी काही माहिती बोर्डवर लिहिलेली नव्हती. मी नेहमीप्रमाणे, गप्पा मारायला आजुबाजूला सावज शोधू लागले. मितानं माझा पावित्रा ओळखून चेहऱ्यावर नाराजी दाखवली.

माझ्या बाजूला तिशीची एक तरुणी होती. तिला चक्क कुणाशीतरी इंग्रजीत बोलताना मी ऐकलं. मग माझ्या तिच्याशी गप्पा सुरू झाल्या. ती स्कॉटलंडची होती. एकंदर युरोपमधले लोक गावांचा उच्चार मजेदार करत होते - म्हणजे पॅरिसला 'पॅरी', रोमला 'रोमा'. फ्लॉरेन्सला 'फिरन्झी' (Firenzi) अशी पाटी बघून माझ्यासारखा नवीन माणूस गोंधळणार नाही का?

ती स्कॉटलंडमधली मुलगी फिरन्झीला घोड्यावरून ट्रेकिंग करायला चालली होती. फ्लॉरेन्समध्ये एकंदरीत बऱ्याच टेकड्या व ट्रेकिंग ॲक्टिव्हिटी आहे असे त्या मुलीच्या सांगण्यावरून लक्षात आलं.

इटलीबद्दलच्या भयकथांमध्ये आम्हाला सांगण्यात आलं होतं की प्लॅटफॉर्मवर जर आपल्याकडे दोन बॅगा असल्या आणि त्यातली एक बॅग आपण उचलून ट्रेनमध्ये ठेवली आणि मग खाली ठेवलेली बॅग घ्यायला आलो तर खालची तरी बॅग गायब झालेली असते किंवा ट्रेनमधली बॅग तरी गायब झालेली असते!

त्यामुळे हातातून बॅग खाली ठेवायचीच नाही. पासपोर्ट चोरणं हे एवढं नित्याचं आहे, की चोरी नोंदवली की तिकडे तुमच्या पासपोर्टच्या झेरॉक्सवर पण काम चालतं. अर्थात हे ऐकीव. तिकडे पुतळ्यांचा ड्रेस करून माणसं पुतळ्यांसारखी उभी असतात. आपल्याला पुतळे आहेत असंच वाटतं. जवळ गेलो की ते एकदम हलतात. आपण दचकतो. त्याचा फायदा घेऊन ते पर्स चोरणं, पासपोर्ट चोरणं असं काहीसं करतात. आम्ही दोघी त्यामुळे जरा सावधच होतो. अर्थात, अजून रोम यायला अवकाश होता.

गाडी कधीतरी आली. गाडी आतून छान होती. आत एक फ्रेंच जोडपं बसलं. त्यांची एक गोड छोटीशी, अडीच-तीन वर्षांची मुलगी होती. गोरी, गुलाबी गालांची. 'क्लोए' (cloa) तिचं नाव. त्याचा अर्थ विचारला, तर नुकताच फुटलेला अंकुर असा त्याचा अर्थ होता. मुलीच्या बापाला इंग्रजी येत होतं, आईला नाही. ते फिरन्झीला सुटीसाठी चालले होते. बराच वेळ क्लोएशी खेळल्यावर गाडी अजून सुटलीच नाही असं लक्षात आलं. चौकशी केल्यावर कळलं की गाडीचं इंजिन फेल झालं आहे. दुसरं मागवलं आहे. यायला व गाडी सुटायला चार-पाच तास तरी लागतील. अरेच्चा! हे सगळं अगदी भारतासारखंच वाटायला लागलं.

सकाळी पाच तास उशिरा रोमला पोचणार म्हणजे आमच्या महत्त्वाच्या तीन दिवसांमधला अर्धा दिवस जाणार! पण काय करू शकत होतो आम्ही! सकाळी उठल्यावर ट्रेनच्या बाहेरचं दृश्य दिसायला लागलं. गाडी लेट होती म्हणून - नाहीतर आम्ही पहाटे सहालाच रोमला पोचणार होतो. तसं झालं असतं तर हे सगळं दृश्य बघायला मिळालं नसतं. सगळं झोपेत अंधारात गेलं असतं.

कन्ट्री साइड युरोपमध्ये कुठंही छानच दिसतं. इटली अगदी थर्ड वर्ल्ड कन्ट्री नाही - पण अडीचावं वर्ल्ड कन्ट्री आहे असं सगळे म्हणत होते.

हिरवे, झाडांनी भरलेले डोंगर पळत होते. विस्तीर्ण शेतं दिसत होती. त्यात चरणारी गुरं, गावातली घरं, घरांचे पुंजके, सगळेच पेटिंगचे विषय. गॅलऱ्यांत जे भिंतीवर निर्जीव दृश्य बघत होतो - तीच दृश्यं इथं सजीव दिसत होती. उतरत्या कौलारू छप्परांची एक-दोनमजली घरं होती. तिथे सगळ्या शेतात Hay - वाळलेल्या गवताच्या एका विशिष्ट आकाराच्या गुंडाळ्या (cylinders) करून ठेवलेल्या जागोजाग दिसत होत्या. जनावरांच्या चाऱ्यासाठी विकत असावेत.

एकंदर गाडी लेट झाली ते एकाअर्थी

बरंच झालं असं वाटायला लागलं. कितीही प्रयत्न केले असते तरी युरोपमधलं फक्त मर्यादितच बघायला मिळणार होतं.

पॅरिसच्या अनुभवावरून रोममध्ये आधीच हॉटेल बुक करून ठेवलं होतं.

रोम काहीतरी वेगळीच अनुभूती देत होतं. पॅरिसपेक्षा वेगळंच होतं. तिथल्या मेट्रो जमिनीपासून फारच खोल होत्या. आत शिरलं की एकदम खाली खोल स्टिप जिने दिसायचे.

मिताचं ते जीपीएस यंत्र वापरून आम्ही बोर्गीस (borghese) गॅलरीला गेलो. ती गॅलरी भल्यामोठ्या बागेनं वेढलेली आहे. तिथले स्थानिक लोक त्या बागेचा आनंद लुटत होते. पायानं पायडल मारायच्या, वेगवेगळ्या आकारांच्या सायकल-रिक्षासारख्या पण स्मार्ट दिसणाऱ्या गाड्या होत्या. सर्व कुटुंब त्यात बसून पायडल मारत होतं. दोन-तीन आगगाडीचे डबे असलेल्या पण पायडल मारायच्या गाड्या पण होत्या. काही तीनचाकी मोटराइज्ड गाड्या होत्या.

आमच्या चालण्याच्या दुराग्रहामुळे आम्ही त्या गॅलरीच्या दारापर्यंत पोचेपर्यंत गॅलरी बंद झाली होती. थोडं वाईट वाटलं. मग बागेत मस्त हिंडलो. छान वाटत होतं. त्यात सुंदर कारंजी होती. कारंजी म्हणजे रोमचा आत्मा असावा. Rome is a city of fountains असं मला कुणीतरी सांगितलं होतं. त्याची झलक दिसायला सुरुवात झाली होती.

GPSच्या (Global Positioning System) साहाय्याने आम्ही बागेतल्या पायवाटा धुंडाळत होतो. वेगवेगळ्या प्रकारची जुनी झाडं बघत होतो. खूप वर्षांपूर्वीची असावी. इटालियन लोक फ्रेंच लोकांच्या मानानं थोराड, मोठ्या हाडापेराचे दिसत होते. फ्रेंच पुरुषांना त्यांच्यापुढे सुंदर म्हटलं तरी चाललं असतं.

आम्ही पायी पायी मग 'स्पॅनिश स्टेप्स'- पायऱ्या - बघायला पोचलो. चौक - त्या चौकात कारंजं होतं. बोटीच्या आकाराचं. चौकात, पायऱ्यांवर, कारंज्याच्या भोवती सगळीकडे तरुण



कारंजं

मंडळींची गर्दी होती. पूर्वी पुण्यातल्या युनिव्हर्सिटीच्या चौकात कारंज्याभोवती कशी गर्दी व्हायची, तिची आठवण झाली. बाजूच्या गल्ल्यांमधून आइस्क्रीमची दुकानं होती, पण रस्त्यावर आपल्यासारख्या भेळ-पाणीपुरीच्या गाड्या नव्हत्या. बोटीच्या एका टोकाला सूर्याचं सुरेख शिल्प होतं आणि सूर्याच्या तोंडातून पाणी बोटीत पडत होतं.

अशी आख्यायिका होती की पूर्वी या स्पॅनिश पायऱ्यांपर्यंत नदीचं पात्र होतं. नंतर पात्र बदललं, पण ही दैवी बोट वाहत वाहत इथे किनाऱ्याला लागली. त्यासाठी 'a ground' असा शब्द वापरला होता.

रोम कारंज्यांचं शहर आहे याचा प्रत्यय येत होता. जागोजागी पाण्याची कारंजी आणि त्या कारंज्यांना सुशोभित करण्यासाठी सर्व शिल्पकारांनी जीव ओतलेला दिसत होता. जवळच 'Fontana di trevi' हे रोममधलं सगळ्यात सुंदर कारंजं आहे असं कळलं. नव्या बिल्डिंगजच्या रांगांमधून चालत चालत निघालो आणि अचानक 'Trevi' म्हणजे तीन रस्ते जिथं मिळतात तिथं ते भव्य शिल्प उभंच ठाकलं. दिवसाची उन्हं उतरणीला लागली होती. आतापर्यंत सगळीकडे गरम गरम वाटत होतं. समोर आलेल्या प्रचंड कारंज्यानं प्रसन्न गारवा दिला. तीन-चार मजली इमारतीएवढा तो मोठा शिल्पसमुदाय! पांढऱ्या संगमरवराचा. १७३०च्या आसपास बांधला गेलेला. मागे मोठमोठ्या सजवलेल्या शुभ्र कमानीमध्ये नेपच्युन-समुद्रदेवता-शिंपल्याच्या भल्यामोठ्या रथामध्ये! - रथाचे दोन प्रचंड घोडे-समुद्री घोडे - त्यातला एक शांत घोडा व दुसरा उधळलेला. समुद्राचे दोन वेगवेगळे मूड सूचित करणारे दोन घोडे. समुद्रदेवतेच्या दोन्ही बाजूंना दोन अप्सरा. एकीच्या हातातल्या कलशातून पाणी वाहतं - विपुलतेचं सूचक- ते सगळं समोरच्या बांधलेल्या जलाशयात आणि दुसरी, आरोग्यवर्धन करणारी देवता. लोक तिथं पाण्याच्या तुषारांचा आनंद घेत होते. दिवस मावळतीच्या दारात आला तसे शिल्पांचे रंग पालटू लागले. कुठूनतरी लपलेल्या दिव्यांचा उजेड त्या शिल्पांची भव्यता अजून वाढवू लागला.

काहीच न बोलता आम्ही दोघी तिथं स्तब्ध बसून होतो, अंगावर तुषार झेलत. त्या पाण्यात नाणं टाकलं की परत तिथे यायची संधी मिळते असं म्हणतात, त्यामुळे उठायच्या आधी दोघींनीही तिथे नाणं टाकलं. त्याचा तळ नाण्यांनी खचाखच भरला होता. तिथून उठल्या क्षणापासूनच त्या पुन्हा 'बुलावा' येण्याची माझी वाट बघणं सुरू झालं. नाणं टाकलं होतं ना!

मावळतीचा सोनेरी रंग कारंज्यावर व इतर इमारतींवर पसरू लागला. आम्ही

परतीला लागलो.

दुसऱ्या दिवशी ओपन बसमधून सिटी टूर घेतली. ऊन तापलं होतं. डोक्यावर ओढण्या/स्कार्फ गुंडाळून बसावं लागत होतं. चौकात छत्र्या विकायला विक्रेते उभे होते.

रोममधली अगणित सौंदर्यस्थळं बघितली. मोठमोठे पिएझ्झा म्हणजे चौक, चर्चेस, स्मारकं. सगळं पांढऱ्या संगमरवरात.

आमची ट्रेन उशिरा पोचल्यामुळे व्हॅटिकन सिटी बघायला मिळणार नव्हतं. कारण ते वीकएंडला बंद होतं. हृदयातली ती सल लपवून मी रोम बघत होते. एका ठिकाणी अतिभव्य चौक दिसला. बसमधून उतरलो. इथे काहीतरी छान असावं असं दिसतच होतं. St. Peters Basilicaची भव्य इमारत पुढे दिमाखात उभी होती. चौक किती मोठा असावा – चार लाख लोक एका वेळेस बसू शकतील एवढा! पांढरे संगमरवरी उंच स्तंभ. अर्धवर्तुळाकार इमारतीचे. प्रत्येक स्तंभाच्या वर पूर्णाकृती मनुष्याकृतींचे शिल्प. निळ्याशार आभाळाच्या पार्श्वभूमीवर ती शिल्प दिमाखात उभी होती. मध्यभागी फॉन्टाना म्हणजे कारंजं.


ख्रिश्चानिटीचं हे जागतिक केंद्र! मायकेलअँजेलो व बर्निनी यांच्या प्रतिभेतून उतरलेलं. तो डोम जगातील सर्वांत मोठा असं म्हणे. ज्या रस्त्याच्या शेवटी ती इमारत होती त्या रस्त्यावरची सर्व झाडं काढली गेली, कारण St. Peters Basilicaची सुंदर इमारत कुठूनही नजरेआड व्हायला नको. त्याच्या सौंदर्याला कुठलीही बाधा नको. ४३० फूट उंचीच्या तो डोम लांबूनही छानच दिसत होता. 'झाडं काढली' ही बाब मनाला जरा टोचलीच.

खूप लोक मधल्या चौकात उभे होते पण चौकच एवढा प्रशस्त होता, की दाटी फार वाटत नव्हती. कुठूनतरी लाउडस्पीकरवर कुणाचा तरी आवाज येत होता. लोक भक्तिभावानं ते ऐकत होते. इमारतीच्या एका खिडकीतून कुणीतरी जमावाला उद्देशून भाषण करत होतं. मग कळलं की तो माणूस म्हणजे चक्क 'पोप' होता. तो ठरावीक दिवशी तिथल्या खिडकीतून लोकांना 'दर्शन' देतो. अनावधानानं आम्हालाही दर्शन झालंच. पायऱ्या चढून आत जायला रांग होती. पायऱ्या चढून आत गेलो आणि डोळे विस्फारले गेले. श्रीमंती तिथं ओसंडून वाहत होती. सोनेरी नक्षीचे खांब. छतावर तितकेच विलासी रंगकाम. एका पुस्तकात त्याचं वर्णन embarassingly rich असं केलंय. खरंच जगावर साम्राज्य करणारी जागा ती कळत होती. त्याची ऐट, दिमाख, तोरा, त्याची प्रत्येक भिंत, प्रत्येक खांब, प्रत्येक कोपरा मिरवत होते.

बर्निनीनं डिझाइन केलेली कॅनपि-मंडप तसाच इमारतीला साजेसा श्रीमंती थाटाचा. सर्व खांबांवर अनेक शिल्पं, छतावर सोनेरी व पांढऱ्या रंगातलं नक्षीकाम. एका कोपऱ्यात एका खांबावर एक भलंमोठं शिल्प होतं. त्यात एकाच संगमरवरी दगडातून मानवाकृती कोरली होती. त्या दगडातून स्त्रीचं शरीर जिवंत झालं होतं. त्याच दगडातून त्या स्त्रीच्या अंगावरचं पारदर्शक तलम वस्त्रही तयार झालं होतं आणि त्यातूनच जाड, मखमली गालिचा तयार झाला होता. काय कौशल्य! एकाच दगडातून हे सगळं? मानवी शरीरही, तलम वस्त्रही आणि गालिचाही!

उजवीकडच्या एका दालनांकडे वळले आणि डोळे, पाय एका जागी थिजले. मायकेलअॅन्जेलोनं केलेलं मूळ शिल्प – पिएता (Pieta) तिथं होतं. Vatican Museum बंद असल्यानं रोममधलं मायकेलअॅन्जेलोचं काम आपल्याला बघायला मिळणार नाही अशी मनाची समजूत घातली होती. सगळी मदार त्या Fontana di Treviमध्ये टाकलेल्या नाण्यावर होती. ते नाणं मला पुन्हा बोलावणार आहे आणि व्हॅटिकन म्युझियमची दारं माझ्यासाठी उघडणार आहेत– कधीतरी. आणि अचानक हे 'पिएता' ती बंद दारं झुगारून बाहेर आलं होतं की काय, माझ्यासाठी!

चौकोनी बंद पेटीत थोडं उंचावर ठेवलेलं. काय क्षण पकडला होता–गोठवला होता शिल्पात–शिल्पकारानं! ख्रिस्ताला नुकतंच क्रुसावर मरण आलेलं. त्याचं मृत शरीर. त्याची आई मेरी ते तिच्या मांडीवर घेऊन बसलेली असं ते जगप्रसिद्ध शिल्प. खाली मान घातलेली मेरी, शांत व करुण भाव चेहऱ्यावर घेऊन. ख्रिस्त मेला आहे, ते त्याचं शव आहे, हे त्याच्या हातातून, शरीरातून जाणवतं. एकाच दगडातून जिवंत शरीर व मृत शरीर साकार झालेलं आहे. मेरी तरुण



पिएता

दाखवली आहे कारण ती पवित्र व त्यामुळे चिरतरुण आहे. ख्रिस्त त्या मानानं म्हातारा आहे. स्त्री आकृतीच्या मांडीवर एक पूर्ण वाढ झालेलं शरीर माववायचं हे मायकेलॲन्जेलो-पुढे आव्हान होतं, समर्थपणे पेललेलं! तिची बोटं त्याच्या मृत हातावर दाब दिल्यानं त्यात रुतल्यासारखी दिसताहेत.

काय वर्णन करावं याचं? आयुष्यातला रोमांचक क्षण. डोळेभरून घेत होते. पण किती वेळ त्या एकाच शिल्पापुढे थांबणार? मेरीच्या वस्त्राच्या चुण्यांवरून नजर फिरत होती ती पुन्हा तिच्या शांत चेहऱ्यावर येऊन स्थिरावत होती.

मितानं मला शेवटी पुढे ढकललं. मी यंत्रवत पुढे हलले.

St. Peters Basilicaचा डोमही मायकेलॲन्जेलोनं डिझाइन केलेला. तो स्वत:ला शिल्पकार सोडून दुसरं काहीही समजायला तयार नव्हता. त्या काळातल्या पोपनं त्याच्यावर सिस्टाईन चॅपेलच्या छतावर पेंटिंग्ज करायची जबाबदारी सोपवली तेव्हा त्यानं परोपरीनं पोपला समजावून सांगायचा प्रयत्न केला होता की पेंटिंग हे त्याचं क्षेत्र नाही. त्याला ते जमणार नाही. जमणार नाही म्हणत त्यानं काय निर्माण केलं? जवळजवळ ३००-३५० मानवाकृतींचं अप्रतिम चित्रण.

तसंच त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या कालखंडात त्याच्यावर St. Peters ची जबाबदारी आली. तेव्हाही मी आर्किटेक्ट नाही म्हणून तो ठासून सांगत होता. पण जबाबदारी घेतल्यावर त्यानं जे काही तयार केलं - ते सर्वोत्तम होतं. जगातील सर्वांत मोठा डोम - तोही गोलाकार नाही तर अंडाकृती. त्यानं केलेला डोम त्याच्या दृष्टीनं आकाशाचा तुकडाच. असीम आकाशाखाली कसं, कुठेही उभं राहिलं तरी आकाशाच्या सीमा दिसत नाही. तसंच त्याला त्याच्या डोमच्या बाबतीत हवं होतं. त्याखाली कुठेही उभं राहिलं तरी त्याच्या सीमा दिसत नाहीत. वर पाहिल्यास एवढा उंच की त्यापलीकडे स्वर्ग व स्वर्गातील देव असावा. शरीर सोडताना आत्म्यानं येथूनच वरवर जावं. स्वर्गातल्या देवाकडे.


घुमट

त्याच्या हयातीत घुमटाचं काम पूर्ण होऊ शकले नाही. परंतु नंतरच्या आर्किटेक्टनी त्याच्या डिझाइनप्रमाणे घुमट पूर्ण केला. बर्निनी, ब्रॅमाते या सगळ्यांचाही St. Peters चा चौक व St. Peters Basilica बनवण्यात महत्त्वाचा सहभाग आहे.

संगमरवर हे मायकेलॲन्जेलोचं पहिलं प्रेम. त्याच्या दृष्टीनं संगमरवर 'जिवंत' असतं. मऊ, उबदार आणि रक्तवाहिन्या असलेलं. सूर्याच्या पहिल्या किरणात संगमरवर कसा दिसतो ते बघून मायकेलॲन्जेलो संगमरवराची प्रत-दर्जा ठरवायचा. छिन्नी-हातोडी हातात असली की स्वर्गच. प्रत्येक मार्बलमध्ये शिल्प असतंच. त्यातला नको तेवढा जास्तीचा भाग काढून टाकायचा एवढंच शिल्पकाराचं काम.

आणखी एक वाचून मला खूप गंमत वाटली होती - ते म्हणजे, शिल्पकार त्यांना लागणारी हत्यारं स्वत: बनवायचे. किती छान संकल्पना आहे. कलाकाराला कसलं व कसं हत्यार पाहिजे ते कलाकाराएवढं अजून चांगलं कोणाला माहिती असणार? आम्हा ऑपरेशन करणाऱ्या सर्जन्सना ही अशी सोय उपलब्ध झाली तर काय छान होईल.

रोमच्या प्रवासात मायकेलॲन्जेलोंचं भूत माझ्या मानगुटीवर बसलं ते नंतर मी त्याचा पूर्ण अभ्यास करून त्याच्याविषयी पुस्तक लिहूनच उतरवलं.

चला मायकेलॲन्जेलोच्या माया-जालातून जरा बाहेर पडायला हवं.

बारबेरीनी कारंजं व त्याच नावाचा एक महाल पाहिला. त्यांचा लोगो होता मधमाश्या! ज्या ज्या म्हणून माध्यमातून मधमाश्या दाखवणं शक्य होतं त्या त्या सर्व माध्यमांतून मधमाश्या दिसत होत्या. म्हणजे कारंज्यात कोरल्या होत्या. महालात छतांवर, भिंतींवर टांगल्या होत्या. लाकडात शिल्पकामात कोरलेल्या होत्या. महालाच्या खांबांवर संगमरवरी शिल्पात होत्या. कशासाठी असं कोणी करत असेल, आपल्या अस्तित्वाच्या खुणा जिकडेतिकडे अशा ठेवायच्या? 'अहं'ला सुखावण्यासाठी की स्वत:चं श्रेष्ठत्व जाहीर प्रदर्शित करण्यासाठी? कुणास ठाऊक? राजेरजवाड्यांच्या मनात काय चालतं; त्याचं मनोवैज्ञानिक विश्लेषण काय हे माझ्यासारख्या मध्यमवर्गीयाला कसं कळणार?

रोममध्ये चौकाचौकांत वस्तू विकणारे सर्व फिरते विक्रेते बांगलादेशी होते. त्यांना हिंदी छान कळत होतं. त्यांना विचारलं तेव्हा कळलं की बहुतेक सर्वांचं कुटुंब त्यांच्या देशात व पुरुषमंडळी इथे दूरदेशी अर्थार्जन करायला.

रात्री पिझ्झा खायला गेलो तर तिथे बांगलादेशी वेटर होता. त्याला सांगून 'भारतीय' पद्धतीचा पिझ्झा बनवून घेतला.

केवढं सुख ते! पॅरिसमध्ये एक रेस्टॉरंटमध्ये 'वॉटर' दे – पाणी दे' असं हरप्रकारे सांगून पाहिलं. खाणाखुणांनी तरी समजलं नव्हतं. मग पोटात खड्डा पडेल एवढ्या किमतीवर पाणी विकत घ्यायला लागलं होतं. इथे जागोजागच्या फॉन्टानामध्ये पाणी फुकट मिळत होतं. बाटल्या भरून घेता येत होत्या.

आम्ही बसलो होतो त्या चौकात, एका गाडीत दोन इटालियन स्त्रिया आल्या आणि रस्त्यावरच्या काही लोकांशी भांडू लागल्या. एवढ्या जोरजोरात की सगळे आपापलं काम थांबवून तेच भांडण बघू लागले. भाषा कळत नसल्यानं आम्हाला काहीच कळत नव्हतं. पण हावभाव, हातवारे, शब्द फेकण्याची पद्धत सर्व बघण्यात गंमत वाटत होती. ते जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात फारसं बदलत नाही असं लक्षात आलं. एकंदरीत प्रसंगावरून त्या वेश्या असाव्यात असं वाटलं. खूप आवाज व संवाद होते तरी 'मूकचित्रपट' बघितल्यासारखं वाटत होतं.




ओबेलिस्क

रोममध्ये 'ओबेलिस्क' – Obelisk जागोजागी दिसले. Rome is supposed to be the capital of obelisk. म्हणजे उंच, निमुळता खांब, वरच्या टोकाशी पिरॅमिडचा आकार असलेला. हा प्रकार मूळ इजिप्तचा असावा. त्यावर खालच्या बाजूला बराचसा इतिहास कोरून लिहिलेला असतो. स्मारक–विजयस्तंभ असं याचं स्वरूप असावं. रोममधले काही ओबेलिस्क इजिप्तमधून आणून उभे केलेले आहेत.

Fontana di Treviमध्ये टाकलेल्या नाण्याच्या भरवशावर आमचा रोममधला कलाप्रवास संपवला.

**– डॉ. माधवी मेहेंदळे**
प्रकाश डोळ्यांचे हॉस्पिटल,
डेक्कन जिमखाना, पुणे
भ्रमणध्वनी : ९८९०९०४१२३
madhavimehendale@gmail.com


# वामनदादा कर्डक यांचे चरित्र




**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

## एका कवीचे जीवनगाणे

### बबन लोंढे

बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ लोकांपर्यंत नेली ती शाहिरांनी. त्यामध्ये वामन कर्डक हे अग्रस्थानीचं नाव. त्यांच्या कार्यक्रमांचा त्यावेळी एवढा दबदबा होता, की त्यांना सिनेमात खेचून नेण्यात आलं, पण वामनरावांची चळवळीवरील निष्ठा इतकी प्रबळ की ते परत त्याच कामात आले. सगळी प्रलोभनं बाजूला सारून. वामनराव आयुष्यभर कार्यकर्त्याचं सर्वसामान्य जिणं जगले. त्यांची ही चरित्रकथा मनस्वी तरुणांना प्रेरक वाटेल अशीच आहे...

थिंक महाराष्ट्र डॉट कॉम


थिंक महाराष्ट्र, लिंक महाराष्ट्र

**महाराष्ट्राच्या जिल्ह्याजिल्ह्यात अनेक कर्तृत्ववान व्यक्ती दडलेल्या आहेत. समाज घडतो, बांधला जातो तो सर्वसामान्यांमधील असामान्यतेमुळे. अशा व्यक्तींचे कर्तृत्व त्यांच्या चांगुलपणा आणि वैशिष्ट्यांसह नोंदवून ठेवण्याचा, एकमेकांशी एका माळेत गुंफून घेण्याचा 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'चा प्रयत्न आहे. 'रुची'च्या या अंकात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरगाव या छोट्याशा गावात तिथल्या मुलांना घेऊन आशयपूर्ण एकांकिका आणि बालनाट्ये सादर करणाऱ्या डॉ. राजेंद्र चव्हाण यांची ओळख करून देण्यात येत आहे.**

# एका आनंदधर्मींची आनंदवाट

**प्रसाद घाणेकर**

'तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार' शिरगावच्या डॉक्टर राजेंद्र चव्हाण यांना मिळाला आणि मन अभिमानाने भरून आले. राजेंद्र चव्हाण हा रंगवर्ती गेली दोन दशके देवगड तालुक्यातल्या शिरगाव या छोट्याशा गावात तिथल्या मुलांना घेऊन एकांकिका करत आहे. कणकवलीत होणाऱ्या आणि राज्यभरात प्रतिष्ठेच्या असलेल्या बॅ. नाथ पै एकांकिका स्पर्धेतल्या बालगटाची पारितोषिके जणू डॉक्टरांची वाट बघत असतात! राजेंद्र चव्हाण आणि शालेय गटासाठीच्या त्यांच्या आशयघन एकांकिका हे सिंधुदुर्ग जिल्ह्यात समीकरण आहे. 'माणसाच्या गोष्टीची गोष्ट' आणि 'पौर्णिमा' या दोन एकांकिकांचे प्रयोग नंदू माधव या रसिक नाट्यकर्मीने परीक्षक म्हणून कणकवलीच्या नाथ पै एकांकिका स्पर्धेत बघितले. त्यांनी एकांकिकेला बक्षीस दिलेच, शिवाय मुंबई-पुणे येथे २६ व २७ जानेवारी २००७रोजी प्रयोगांचे आयोजन केले. त्यामुळे डॉक्टरांच्या कामाचे वेगळेपण बालनाट्य चळवळीतल्या ज्येष्ठांच्या, रंगकर्मींच्या लक्षात आले. हे प्रयोग मोहन वाघांनी बघितले आणि त्यांनी २००७ च्या मे महिन्यात मुंबई येथे पाच प्रयोगांचे आयोजन केले. श्रीराम लागूंच्या रूपवेध प्रतिष्ठानने त्यांना 'तन्वीर




डॉ. राजेंद्र चव्हाण

नाट्यधर्मी पुरस्कार, २००९' देऊन त्यांच्या कामावर राममुद्रा उठवली.

राजेंद्र चव्हाण यांना रंगभूमीचे आकर्षण लहानपणापासूनचे. त्यांचे किरोली हे सातारा जिल्ह्याच्या कोरेगाव तालुक्यातले गाव. घर गावाच्या चावडीजवळ. त्यामुळे डॉक्टरांना चावडीजवळच्या देवळातल्या कीर्तन-हरिपाठापासून देवळाच्या प्रांगणातल्या तमाशा-नाटकांपर्यंतच्या करमणुकीच्या सगळ्या कार्यक्रमांत सहभाग घेता आला. त्यांची आजी नकला करायची - गोष्टी सांगायची. विशेष म्हणजे शाळेतले सगळे शिक्षक राजेंद्रवर माया करायचे. लहान राजेंद्रच्या पायांना चिखल लागू नये, तो पडू नये म्हणून त्याला पावसाच्या दिवसांत खांद्यावर बसवून नेणारे शिक्षकही त्यांना लाभले. गणित-विज्ञान या विषयांबरोबरच चित्रकलेचेही उत्तम अंग असलेले पंडित गुरुजी त्यांना भेटले.

राजेंद्रना नाटकात काम करायची सवय लागली आणि ती पुढे वाढतच गेली. ते आठवीपासूनच्या शिक्षणासाठी मुंबईतल्या रामटेकडी (शिवडी) वस्तीत आले. ते राहणे झोपडपट्टीतले. डॉक्टरांनी त्या वस्तीत जीवनाची भीषण रूपे पाहिली. पण डॉक्टर सोशल सर्व्हिस लीगच्या परळ हायस्कूलमध्ये मनापासून रमले. तेथेही त्यांना पालकांसारखे प्रेम करणारा शिक्षकवर्ग लाभला. प्राथमिक शाळेपासूनच्या अशा प्रेमळ गुरुजनांमुळेच डॉक्टरांच्या एकांकिकांतले सर किंवा मॅडम प्रेमळ, समजूतदार आणि विद्यार्थ्याला स्वतंत्र निर्णयाचे स्वातंत्र्य देणारे असतात.

त्यांचे शाळेतले जीवन आणि घरातले व सभोवतालचे जीवन यांत दोन ध्रुवांइतके अंतर होते. झोपडपट्टीतले दादा, दारूविक्री करणारी लहान मुले, रात्रभर चालणारे कॅरमचे डाव, नवऱ्यांची अनन्वित हिंसा सहन करणाऱ्या बायका हे सगळे जीवन डॉक्टर सभोवताली बघत होते आणि शालेय व पुढे वैद्यकीय महाविद्यालयातल्या जीवनात साहित्य-कला-नाटक यांमधून माणुसकीने जगण्याचे शिकत होते.




**रामदास भटकळ यांच्या हस्ते तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार स्वीकारताना. सोबत ज्येष्ठ अभिनेते श्रीराम आणि दीपा लागू**

डॉक्टरांनी एम.बी.बी.एस. झाल्यानंतर मुंबईत न राहता किंवा जन्मगाव किरोलीजवळचा भाग न निवडता सिंधुदुर्ग जिल्ह्याची निवड केली. त्यातले एक कारण होते सिंधुदुर्ग जिल्ह्याची रसिकता आणि कलासक्ती. डॉक्टरांना जशी स्वत:ची नैतिक मूल्ये पाळून वैद्यकीय सेवा द्यायची होती तशीच रंगभूमीवर काहीतरी करून बघायची ऊर्मी होती. शिरगावला आल्यावर डॉक्टर तिथली प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळा यांच्या संपर्कात आले. डॉक्टरांची मुलांच्यात मूल होऊन त्यांच्याशी गप्पा मारताना, त्यांना गोष्टी सांगताना, त्यांचे अनुभव ऐकताना, चित्रे काढून देताना मुलांशी छान गट्टी जमली. शिरगावमधल्या पालकांनाही त्यांची मुले डॉक्टरांच्या सहवासात आहेत म्हणजे निर्धास्त वाटू लागले. एकत्र आलेल्या अशा त्या सगळ्यांनाच काही निर्मिती करावी, सृजनसाहस करावे असे वाटू लागले.

राजेंद्र चव्हाण मुंबईत वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असल्यापासून, कणकवलीच्या प्रतिष्ठित 'नाथ पै एकांकिका स्पर्धे'बद्दल ऐकून होते. शिरगावपासून तर कणकवली पंचवीस किलोमीटरवर. त्यामुळे डॉक्टर व त्यांचा शिरगाव मित्र परिवार यांनी शिरगावात मुलांबरोबर ते करत असलेले काम या एकांकिका स्पर्धेच्या निमित्ताने लोकांसमोर आणता येईल असा विचार केला. त्याचीच परिणती म्हणून 'शिरगाव फ्रेंड सर्कल' व 'शिरगाव हायस्कूल'च्या संघाने 'नाथ पै स्पर्धे'च्या बाल एकांकिका गटात सहभाग घेतला. डॉक्टरांचा उत्साह आणि ऊर्जा यांच्या संसर्गाची बाधा सगळ्यांना झाली आणि शिरगावची मुले एकांकिका स्पर्धेत तृतीय पारितोषिकाची मानकरी ठरली. डॉक्टरांची मुलगी रूपाली हिला तर 'मुक्ताई'च्या भूमिकेसाठी पहिले पारितोषिक मिळाले. रात्री दोन वाजता सादर झालेल्या त्या प्रयोगाला इतक्या उशिराही शंभर–सव्वाशे कणकवलीकर रसिक प्रेक्षक उपस्थित होते. पारितोषिक वितरणाच्या वेळी परीक्षक कै. उदय खानोलकर रूपालीच्या अभिनयाबद्दल भरभरून बोलले.

राजेंद्र चव्हाण आणि त्यांच्या शिरगाव संघाचा १९९१ मध्ये सुरू झालेला हा प्रवास आजही सुरू आहे. 'बॅ. नाथ पै एकांकिका स्पर्धे'च्या बालगटात शिरगावची एकांकिका असणे आणि प्रेक्षकांनी ती बघण्यासाठी आवर्जून थांबणे हा प्रतिष्ठेचा विषय झाला आहे. डॉक्टर आधी एकांकिका लिहून मग ती मुलांबरोबर बसवत असत. तेव्हा त्यांच्या प्रतिभेचा उमाळा इतका जबरदस्त असायचा, की ते संपूर्ण एकांकिका एका झपाट्यात लिहून पुरी करत. डॉक्टरांनी काही वर्षांनी मात्र, नवीनच पद्धत अमलात आणली. त्यांनी मुलांशी चर्चा करत, त्यांना विषय देत, त्यांच्या सूचना समजून घेत, त्यांच्याकडून उत्स्फूर्त संवाद घेऊन एकांकिका लिहायला सुरुवात केली. अशा प्रकारे एखाद्या नाट्यबीजाचा विकास करत एकांकिका लिहिणे आणि सादर करणे आव्हानात्मक असते. डॉक्टरांना, त्यांच्या सहकाऱ्यांना आणि काम करणाऱ्या मुला–मुलींना सुरुवातीला एकांकिका कोणते रूप घेणार याची कल्पना नसते. धुक्यातून वाट काढत जावे आणि ती वाट एका नयनरम्य स्थळी पोचावी तसे विलोभनीय नाट्य असते. प्रक्रियेत सगळेच सहभागी असल्यामुळे सगळी प्रक्रिया, त्यातले संवाद, पात्रांचा वावर हा नैसर्गिक असतो; कारागिरी अल्प असते, ती फक्त तांत्रिक अंगांसाठी. बाकी सगळे झुळझुळत्या झऱ्याप्रमाणे.

ग्रामीण जीवन आणि समस्यांवर प्रकाश टाकण्यासाठी राजेंद्र चव्हाण यांनी



**मन पाण्याचे या नाटकातील एक दृश्य**

‘नवे नवे आकाश हवे’, ‘आयंता’, ‘फास्टी फॉरवर्ड’, ‘पौर्णिमा’, ‘माणसाच्या गोष्टीची गोष्ट’ अशी अनेक नाटके लिहिली आहेत. राजेंद्र चव्हाण यांनी मुलांची निरागसता म्हणजे काय, आजूबाजूच्या वास्तवाशी ती कशी रिॲक्ट होतात, त्यांच्यावर संस्कार कसे करता येऊ शकतात, मुलांच्या कल्पनाशक्तीची झेप कुठवर जाऊ शकते, त्यातून नवसृजन कसे घडू शकते याचा ऊहापोह ‘पौर्णिमा’ आणि ‘माणसाच्या गोष्टीची गोष्ट’ या बालनाट्यांमधून केला आहे. ‘आयंता आणि इतर एकांकिका’ या त्यांच्या पुस्तकाला २००० सालचा राज्यशासनाचा पुरस्कार मिळाला आहे. ‘राजेंद्र स्कूल’च्या एकांकिका कणकवलीकर रसिक आणि सिंधुदुर्गातही अनेकजण मनापासून बघतात, त्यांचा आनंद घेतात आणि समृद्ध होतात. डॉक्टरांच्या बालनाट्यांचे सगळ्यांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांतला आशय. मनोरंजन, तंत्र, स्पर्धेत यशस्वी होण्यासाठीची गिमिक्स असलेल्या उधार-उसनवारीचा संपूर्ण अभाव. आशय केंद्रस्थानी ठेवून नाट्यरचना केली जाते. डॉक्टरांनी गेल्या वीस वर्षांत किती विविध विषय या एकांकिकांमधून हाताळले आहेत! पर्यावरण, दूरचित्रवाणीचे आक्रमण, विज्ञाननिष्ठा, निसर्गाशी बांधीलकी, कुटुंबातले स्नेहसंबंध... आणि हे सगळे सकारात्मक पद्धतीने, उपदेशाचा आव न आणता. दोन वर्षांपूर्वी तर त्यांनी सिंधुदुर्गातली भटकी जमात कातकरी (वानरमार जमात) आणि त्यांच्या जीवनाचा व मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न संवेदनशीलतेने ‘धनू’ एकांकिकेतून हाताळला आणि नवल हे, की एकांकिकेतल्या प्रमुख भूमिकेत कातकरी मुलेच होती. डॉक्टरांच्या एकांकिकेत खलभूमिका नसतात. कुठलीच व्यक्ती वाईट नसते. तिचे वर्तन त्या-त्या परिस्थितीत चुकत असेल, पण व्यक्ती मूलत: खलप्रवृत्ती नसते यावर डॉक्टरांचा ठाम विश्वास आहे. आई-वडिलांच्या नैतिक मूल्ये जपण्याच्या संस्कारांमुळे डॉक्टर त्यांची साधनशुचिता,



**मुलांसोबत संवाद**

विवेक, माणुसकी जपू शकले. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून दिसते.

“नाटकातून मलाच स्वत:ला तपासता येतं. काही प्रश्न समाजाला विचारता येतात. मुख्यत: ज्यांचे प्रश्न नाटकातून मांडतो, त्याच वर्गातील मुले नाटकात काम करत असल्यानं त्यांना वेगळा अभिनय करावाच लागत नाही. त्यांचं जगणंच नाटक होऊन जातं. तेही ममतेपासून समतेपर्यंत जाणारं.” डॉ. राजेंद्र चव्हाण म्हणतात.

डॉक्टरांनी ‘अकरावा अवतार’ अशी एकांकिका लिहून ती खुल्या गटात एकदा सादर केली. पण मोठ्यांच्या नाटकात डॉक्टर रमले नाहीत. त्यांच्याच ‘ले चल गोकुलगाव’ या एकांकिकेत मोठ्या माणसांची कामे मोठ्या माणसांनी आणि लहानांची कामे लहानांनी करून तिचे काही प्रयोग केले. पण ही उदाहरणे अपवादात्मक. इतकी वर्षे इतके आशयघन, अर्थपूर्ण काम करूनही त्यांची त्या मानाने दखल घेतली गेली नाही याचे किंचितसे शल्य डॉक्टरांना आहे. त्यांना समीक्षकांनी बालनाट्यात आशयाच्या दृष्टीने कधी पाहिले नाही असाही सल आहे. त्यांचे वाचन चांगले असल्याने मराठीतले निवडक साहित्य त्यांतल्या नाट्याच्या शक्यतांसह त्यांना खुणावत असते.

राजेंद्र चव्हाण हे नाव इतकी वर्षे काम केल्यावरही मुंबई-पुण्याच्या अभिजनांना अपरिचित आहे. किती काळ मी स्वत:ला प्रूव्ह करत राहायचे? अशी एक व्यथाही डॉक्टरांना अस्वस्थ करते. अर्थात डॉक्टर अशा अस्वस्थतांनी फार काळ निराश होत नाहीत. ते आपली आनंदवाट ‘एकला चलो रे’सारखी शिरगावची मुले, पालक, तिथले शिक्षक यांच्यासोबत पुन्हा चालू लागतात. त्यांच्या यशात मुलांबरोबरच त्यांचे पालक आणि शिक्षक यांची समर्थ आणि समजूतदार साथ नसती तर एवढे काम त्यांच्या हातून झाले नसते हेही ते जाणतात.

डॉक्टर नोव्हेंबर-डिसेंबर असे दोनच महिने एकांकिका करतात. त्यानंतर वर्षाचे दहा महिने ते त्यांच्या वैद्यकीय सेवेत मग्न असतात. डॉक्टरांचे शिरगावला ‘रूपाली हॉस्पिटल’ आहे. रूपाली हे त्यांच्या मुलीचे नाव. हॉस्पिटलमध्ये सहा बेडची सोय आहे. तिथे कुठल्याही प्रकारच्या अनावश्यक वैद्यकीय चाचण्या, सलाईन्सचा वापर आदी केले जात नाही. त्यांनी व्यवसायात कसल्याही अपप्रवृत्तींचा शिरकाव जाणीवपूर्वक होऊ दिलेला नाही. ते कोळोशी इथल्या ‘नारायण आश्रम’ या सेवाभावी संस्थेबरोबर आजुबाजूच्या परिसरात ग्रामीण शिक्षणाचे व आरोग्याचे काम करतात. चॅरिटेबल डिस्पेन्सरी चालवणे, अंगणवाडी शिक्षकांसाठी शिबिरे घेणे, अपंगांना आवश्यक ती साधने मिळवून देणे, आरोग्यसेविकांना माहिती देणे, गुटखाविरोधी (याप्रमाणे विविध विषयांवर) चित्रांच्या स्पर्धा आयोजित करणे, विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रांतील अभ्यासू व्यक्तींची व्याख्याने आयोजित करणे, मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल अशा पद्धतीने कॅम्प आयोजित



**संगणकातील पेंट हे साधे ॲप्लिकेशन वापरून डॉक्टरांनी काढलेले चित्र**

करणे, पर्यावरणाची माहिती करून देणाऱ्या सहली काढणे असे अनेक उपक्रम डॉ. चव्हाण राबवतात. अनेकदा, ते बचतगटांमध्ये जाऊन तिथे सिनेमा दाखवतात. सिनेमा पाहिल्यानंतर त्यावर बचतगटाच्या महिलांशी चर्चाही करतात. १९९२ पासून ते शिरगावच्या मागासवर्गीय विद्यार्थिगृहाशी संलग्न आहेत. या वसतिगृहात पन्नास मुले आहेत. त्यांना मोफत औषधे पुरवणे, अभ्यासात मदत करणे अशी कामे डॉक्टर करत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना ते जवळचे वाटतात. मुले डॉ. चव्हाणांना 'डॉक्टरकाका' अशी हाक मारतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी ते डॉक्टरांशी मनमोकळे-पणाने बोलतात.

डॉक्टरांचा नवनवीन गोष्टीच शिकण्याकडे कल असतो. एकदा त्यांनी चक्क केस कसे कापावेत हेच शिकून घेतले आणि तेव्हापासून ते आपल्या मुलांचे केस घरीच कापू लागले. बऱ्याच वेळा ते वसतिगृहातील विद्यार्थ्यांचेही केस कापत असत. विद्यार्थी हॉस्पिटलमध्ये अभ्यासातील अडचणी सोडवण्यासाठी येत असत. काही विद्यार्थ्यांनी हॉस्पिटलला भेट दिली असता त्यांनी विचारले, ''काय काम आहे?'' विद्यार्थी म्हणाले, ''डॉक्टरकाका, केस कापायचे आहेत!'' असे काही गमतीदार अनुभवही डॉक्टरांना येत असतात.

'वसंतराव आचरेकर प्रतिष्ठान'कडून २०१२ च्या एप्रिल महिन्यात आयोजित करण्यात आलेले कला शिबिर डॉक्टरांकडून घेण्यात आले. ते संपल्यानंतर असा उपक्रम कायमस्वरूपी सुरू ठेवण्याची मागणी विद्यार्थी-पालकांकडून होऊ लागली आहे. डॉक्टरांनाही शिबिरातून आपल्याला अनेक गोष्टी शिकता येतील असे वाटले आणि 'सृजनाच्या वाटा' या शिबिराची सुरुवात झाली. प्रतिष्ठानच्या कणकवली येथील सभागृहात दर शनिवारी सायंकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत डॉक्टरांकडून हे शिबिर घेण्यात येते. या शिबिरात सध्या पस्तीस मुले सहभागी होतात. या शिबिरात मातीकामापासून अभिनय करणे, गाणी रचणे, त्यांना चाली लावणे, विषय देऊन त्यावर मुलांकडून लेखन करवून घेणे, चित्रे काढणे, नृत्ये करणे, मुलांशी गप्पा मारणे अशी धमाल-मस्ती सुरू असते.

डॉक्टरांच्या कुटुंबात एकूण पाच सदस्य. ते स्वतः, त्यांची पत्नी मालन. मालनवहिनींचे शिक्षण फारसे झालेले नसले तरी त्यांना शेती आणि बागकामांची फार आवड आहे. त्या डॉक्टरांच्या सगळ्या उपक्रमांमध्ये सहभागी असतात. डॉक्टरांची मोठी मुलगी रूपाली इन्फोसिस कंपनीत पाच वर्षे इंजिनीयर म्हणून कार्यरत होती. तिचे यजमानही इंजिनीयर आहेत. ती लग्नानंतर तिच्या तीन वर्षांच्या बाळासोबत रमली आहे. रूपालीहून लहान असलेल्या तृप्तीने जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्‌समधून कमर्शिअल आर्टची पदवी मिळवली असून पुण्याच्या 'एफ.टी.आय.आय.'मधून आर्ट डिरेक्शनचा तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. ती सध्या एका हिंदी चित्रपटावर, तसेच सुनील सुकथनकर/ सुमित्रा भावे यांच्या आगामी 'संहिता' या चित्रपटावर असिस्टंट आर्ट डिरेक्टर म्हणून काम करत आहे. सर्वांत लहान मुलगा अरुणने पुण्यात फर्ग्युसनमधून बायोटेकमध्ये बी.एस.सी., मुंबईच्या टी.आय.एफ.आर. मधून एम.एस्सी. केले असून सध्या तो अमेरिकेतील येल विद्यापीठात उत्क्रांती आणि पर्यावरण या विभागात संशोधन करत आहे. डॉक्टर म्हणतात, की 'माझी मुले खेडेगावात मराठी शाळेत शिकली. मात्र तरीही त्यांनी जी क्षेत्रे निवडली त्यात ती प्रगती करत आहेत.' त्यामुळे केवळ इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याचा अट्टहास योग्य नसल्याचे मत डॉक्टर मांडतात.

डॉक्टरांचा दिनक्रम व्यस्त असला तरी सायंकाळी सातनंतर त्यांच्याजवळ मोकळा वेळ असतो. मग ते मालनवहिनींबरोबर आजुबाजूच्या परिसरात फिरायला जातात, स्वत:चा ब्लॉग लिहितात, अजय कांडर-सारख्या कविमित्राच्या 'आवानओल'-मधल्या कवितांची रेखाटने करतात, गाणी रचतात, त्यांना चाली लावतात आणि गणित हा आवडीचा विषय असल्याने दहावी-बारावीच्या गणिताच्या प्रश्नपत्रिकाही छंद म्हणून सोडवतात! हा माणूस रोजच्या जीवनात साधा आणि निगर्वी असतो. एका पिसाने मोर म्हणून मिरवणाऱ्या जगात हा रंगीबेरंगी पिसाऱ्यांचा मालक आपल्या जगण्यातला आनंद अतिशय साधेपणाने, समाधानाने घेत असतो आणि भोवतालच्यांना देत असतो.

**डॉ. राजेंद्र चव्हाण**
मु.पो. शिरगाव, ता. देवगड,
जि. सिंधुदुर्ग ४१६६१०
भ्रमणध्वनी ९७६७०२३५९३
दूरध्वनी ०२३६४-२३६२५६
rajendra.chavan60@gmail.com
www.rajendrachavan60.blogspot.com
www.kavitetoon.blogspot.com


**- प्रसाद घाणेकर**
ऐसपैस, नाडकर्णीनगर,
कलमठ-कणकवली-४१६६०२
भ्रमणध्वनी ९४२१२६४३००
दूरध्वनी - (०२३६७) २३२५५३
pragh21@yahoo.co.in

# ‘दि मेन्स इन ऑलिव्ह ग्रीन्स’चे प्रकाशन

**प्रतिनिधी**

युद्धाच्या रोमांचकारी कथा सांगण्या-ऐकण्याची परंपरा संजय-धृतराष्ट्रापासून आजतागायत चालू आहे. पण उद्या, युद्धात प्रत्यक्ष लढणारा अर्जुनच जर ही कथा सांगू लागला तर त्याला वेगळाच आयाम मिळेल. (निवृत्त) कर्नल सुधीर नाफड यांच्या ‘दि मेन्स इन ऑलिव्ह ग्रीन्स’ या पुस्तकाच्या निमित्ताने ग्रंथालीने हीच संधी साधली आहे. जीवावर उदार होऊन देशासाठी लढणारा हा सैनिक योद्धा नक्की घडतो कसा? त्याला गीतेचे सार सांगणारे हे आधुनिक कृष्ण असतात कसे? प्रत्यक्ष युद्धात तो क्षणाक्षणाला कुठकुठल्या मानसिक व शारीरिक आव्हानांना सामोरा जातो आणि युद्धाशिवाय तो माणूस म्हणून असतो तरी काय? याचा एक पटच कर्नल नाफड यांनी सहजपणे उलगडून दाखवला आहे.

नुकतेच, मंगळवार २ ऑक्टोबर रोजी गांधीजयंतीचे औचित्य साधत या पुस्तकाचे प्रकाशन, पुणे येथे मयुर कॉलनीतील जोग हायस्कूलच्या एमजेएस सभागृहात पार पडले. नुकत्याच पडलेल्या पावसाने हवेत सुखद गारवा होता आणि सभागृहात प्रकाशन कार्यक्रमाला तेवढीच सुखद गर्दी होती. सहसा वेळेबाबत फार काटेकोर असणारे पुणेकर इथे मात्र आगंतुकपणे लवकर येऊन हजर होते. त्याला कारणही तसेच होते. या पुस्तकाचे प्रकाशन ज्यांच्या हस्ते होणार होते त्या दोन्ही व्यक्तीही त्याला साजेशा तोलामोलाच्या होत्या. (निवृत्त) एअर चीफ मार्शल प्रदीप नाईक (परमविशिष्ट आणि विशिष्ट सेवा पदक) आणि विख्यात मनोविकारतज्ज्ञ




**‘दि मेन्स इन ऑलिव्ह ग्रीन्स’ या पुस्तक प्रकाशनसमयी ब्रिगेडियर दीपक भट, मनोविकारतज्ज्ञ डॉ. उल्हास तुकतुके, एअर चीफ मार्शल प्रदीप नाईक, लेखक कर्नल सुधीर नाफड आणि ‘ग्रंथाली’चे धनंजय गांगल**

डॉ. उल्हास तुकतुके.

कर्नल सुधीर नाफड यांनी पुस्तका-मागची आपली भूमिका मांडली. विशेषत: निवृत्त सैनिकाबाबत समाजाचे असलेले चुकीचे ग्रह त्यांनी सोडून काढले.

डॉ. उल्हास लुकतुके यांनी माणसाचे आणि विशेषत: सैनिकातील माणसाचे मनोविश्व उगलडून दाखवले. त्यांचे भाषण खूपच रंगले.

‘ग्रंथाली’चे धनंजय गांगल यांनी ग्रंथाली वाचक चळवळीचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच रूढ अर्थाने लेखक नसलेले कर्नल सुधीर नाफड यांच्यासारखी वेगवेगळ्या व्यवसायांतील स्फुल्लिंगे शोधून त्यांना लिहिते करण्याची ग्रंथालीची वेगळी वाट श्रोत्यांपर्यंत पोचवली आणि ‘जाणिवा’ वाढवण्याच्या ग्रंथालीच्या कामाला श्रोत्यांनी जोरदार टाळ्या वाजवून दाद दिली.

आधीच्या वक्त्यांचा दमदार भाषणाचा उल्लेख करत, ‘आता मी अजून काय बोलणार’ अशी जरी बचावात्मक सुरुवात प्रमुख पाहुणे एअर चीफ मार्शल प्रदीप नाईक यांनी केली तरी नंतर त्यांचे भाषण क्षणोक्षणी रंगत गेले. त्यांनी सामान्य नागरिक आणि सैनिक यांच्या मानसिकतेतील फरक बारकाव्यांनिशी सांगितला. या पुस्तकातही त्याचे असलेले संदर्भ त्यांनी उलगडून दाखवले. त्यांच्या पदाला साजेसेच त्यांचे भाषण झालं.

या हृद्य प्रकाशन सोहळ्यानंतर सभागृहातील श्रोत्यांच्या बाहेरील पुस्तक विक्री स्टॉलवर उड्या पडल्या नसत्या तर नवलच. कार्यक्रम संपल्यावर सहसा क्षणभरही न रेंगाळणारा पुणेकर श्रोतृवर्ग बराच काळ लेखक, ग्रंथाली आणि पाहुण्यांशी रेंगाळला आणि हळुहळू काळोखात विरून गेला.

# 'अस्मितादर्श'मधील निवडक वैचारिक लेखन, कथा, कविता


## यांचे बबन लोंढे आणि सुधाकर गायकवाड यांनी केलेले संकलन-संपादन




प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे संपादन करत असलेल्या 'अस्मितादर्श' या त्रैमासिकामधील गेल्या चाळीस वर्षांतील निवडक लेखांचा 'आंबेडकरी विचारधारा' हा अनमोल दस्तावेज आहे.या ग्रंथात सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन, लोककला, राजकीय, संशोधनात्मक आणि पुरातत्त्व अशा विविध विषयांवरील लेखांतून तथाकथित पूर्वास्पृश्यांचा, दलितांचा इतिहास; तसेच, १९५६ नंतरच्या धर्मांतरित बौद्धांच्या विविध चळवळी यांचे प्रतिबिंब पाहावयास मिळते.


हा सामाजिक परिवर्तनाच्या संघर्षमय चळवळीचा सृजनशील असा वाङ्मयीन, वैचारिक आविष्कार आहे.

**आंबेडकरी विचारधारा**
**बबन लोंढे / सुधाकर गायकवाड**
**मूल्य ६०० रुपये • सवलतीत ३६० रुपये**




'काळोखगर्भ' या प्रातिनिधिक कथासंग्रहातून गेल्या तीन पिढ्यांच्या कथाकारांनी मानवी आयुष्यातील भीषण अनुभव आणि जगण्यातला नेहमीचा संघर्ष उद्घोषित केला आहे. हा सामाजिक परिवर्तनाच्या संघर्षमय चळवळीचा सर्जनशील आविष्कार आहे.

**काळोखगर्भ**
**बबन लोंढे / सुधाकर गायकवाड**
**मूल्य २५० रुपये • सवलतीत १५० रुपये**




'अस्मितादर्श'च्या गेल्या पस्तीस वर्षांच्या वाङ्मयीन प्रवासातल्या निवडक कवितांचे बबन लोंढे व सुधाकर गायकवाड यांनी केलेले हे संकलन/संपादन. हा आंबेडकरी चळवळीचा अनमोल दस्तावेज आहे. दलित साहित्याच्या संशोधकांना, अभ्यासकांना, वाचकांना व पुरोगामी चळवळीतल्या कार्यकर्त्यांना 'निर्णायक युद्धानंतर' विचारप्रवृत्त करील!

**निर्णायक युद्धानंतर...**
**बबन लोंढे / सुधाकर गायकवाड**
**मूल्य १२५ रुपये • सवलतीत ७५ रुपये**

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने

## आयोजित ग्रंथयात्रेचा

## २५

## प्रदर्शनांचा पहिला टप्पा पूर्ण!



केज



माजलगाव



आंबेजोगाई



वाशी



कळंब

# यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त आयोजित ग्रंथयात्रेतील क्षणचित्रे

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली' करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा वुलन मिल म्युनि. स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.